


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक ३०५ ■ शुक्रवार, दि.१५ मे २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# पेट्रोल-डिझेलच्या किमतीचा भडका !

## ▸▸निवडणुका होताच सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री ▸▸पुढचा नंबर घरगुती गॅस सिलिंडरचा?

प्रतिनिधी १५ मे

**मुंबई :** निवडणुका संपताच देशातील पेट्रोलियम कंपन्यांनी शुक्रवारपासून पेट्रोल आणि डिझेलच्या दरात वाढ करण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. पेट्रोल ३ रुपये प्रति लीटर आणि डिझेल ३.११ रुपये प्रति लीटर इतके महागले आहे. या इंधन दरवाढीमुळे महागाई भडकण्याची शक्यता आहे.




अशातच आता सर्वसामान्यांची चिंता वाढवणारी एक माहिती समोर आली आहे. त्यानुसार घरगुती गॅस सिलिंडरच्या किंमतीतही वाढ होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

गुरुवारी मध्यरात्रीपासून पेट्रोल आणि डिझेलच्या दरात वाढ करण्याची घोषणा केली. एप्रिल २०२२ नंतर पेट्रोल आणि डिझेलच्या दरात पहिल्यांदाच वाढ करण्यात आली आहे. त्यानुसार पेट्रोल ३ रुपये प्रति लीटर आणि डिझेल ३.११ रुपये प्रति लीटर इतके महागले आहे. या दरवाढीमुळे देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत पेट्रोलचा दर १०६.५४ रुपयांवर पोहोचला आहे. तर डिझेल तीन रुपयांनी महागल्यामुळे प्रतिलीटर ९३ रुपयांवर जाऊन पोहोचले आहे. अगोदरच गॅस दरवाढ आणि गॅसच्या पुरवठ्यातील अनियमिततेमुळे ग्राहक हैराण झाला आहे.

देशातील अनेक शहरांसह गावांमध्ये गॅससाठी अजूनही लांबच लांब रांगा आहेत. त्यामुळे महागाईचे चटके सहन करणाऱ्या जनतेवर आणखीच ताण येणार आहे. एकूणच आखाती देशात सुरू असलेल्या युद्धाचा फटका जगभरात बसत आहे. त्यात भारतातील जनतेला याच्या झळा बसत आहेत. रोजच्या जीवनात नागरिकांसाठी अविभाज्य बनलेल्या वाहनांच्या बाबतीत ही चिंताजनक बाब आहे. दरम्यान, फक्त भारतातच नाही, तर इतर देशांमध्येही युद्धाच्या पार्श्वभूमीवर पेट्रोल-डिझेलच्या किंमतीमध्ये विक्रमी वाढ नोंदवली गेली आहे.

### शहरांमधील पेट्रोलचे दर

| | |
|---|---|
| अकोला | १०७.२७ |
| अमरावती | १०८.१४ |
| नागपूर | १०७.३७ |
| मुंबई | १०६.६८ |
| ठाणे | १०६.८४ |
| पुणे | १०६.८२ |
| छ. संभाजीनगर | १०६.३४ |
| सोलापूर | १०७.१९ |
| नाशिक | १०७.९३ |
| कोल्हापूर | १०७.४९ |
| रत्नागिरी | १०८.३५ |

### विरोधकांनी केंद्र सरकारला घेरले!

राहुल गांधी म्हणाले... 'महागाईच्या काळात मोदींनी लोकांवर आसूड उगारला आहे. पेट्रोल-डिझेल प्रति लिटर ३ रुपयांनी महाग झाले आहे. तर सीएनजीचे दरही २ रुपयांनी वाढवण्यात आले आहेत. निवडणूक संपताच मोदींची वसुली सुरू झाली आहे.' अखिलेश यादव म्हणाले... 'निवडणुका संपताच भाजपा सरकारने जनतेला महागाईची आणखी एक भेट दिली आहे. पेट्रोल-डिझेल ३ रुपयांनी महागले आहे. लोक आधीच महागड्या गॅस, वीज बिलामुळे त्रस्त आहेत. आता पेट्रोल-डिझेलचे दर वाढवून सरकारने लोकांचे कंबरडेच मोडले आहे. आता भाजपा नकोच.'

### राज्यातील पेट्रोलपंप रविवारी बंद?

'रविवारी इंधन उपलब्ध होणार नाही.आंध्र प्रदेश, तेलंगणा, तामिळनाडू, केरळ, पुदुचेरी, महाराष्ट्र आणि हरयाणा या राज्यांमध्ये पेट्रोल पंप प्रत्येक रविवारी बंद राहतील, असा दावा करणारी एक पोस्ट व्हायरल झाली आहे. या पोस्टमध्ये इंडियन पेट्रोल डीलर्स एक्झिक्युटिव्ह कमिटीने निर्णय घेतल्याचे म्हटले आहे. प्रेस इन्फॉर्मेशन ब्युरोच्या फॅक्ट चेक युनिटने व्हायरल पोस्टचा स्क्रीनशॉट शेअर करत लिहिले आहे की, 'पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या इंधन वाचवण्याच्या आवाहनानंतर रविवारी काही राज्यांमध्ये पेट्रोल पंप बंद राहतील, असा दावा करणारी एक पोस्ट सोशल मीडियावर फिरत आहे. हा दावा खोटा आहे.' तसेच, केवळ अधिकृत स्रोतांवरच विश्वास ठेवावा, असा सल्लाही देण्यात आला आहे.

# नीटची पुनर्परीक्षा होणार 21 जूनला-धर्मेंद्र प्रधान

## परीक्षा शुल्क मिळेल परत, शहर निवडण्याचा दिला जाणार पर्याय

वृत्तसंस्था १५ मे

**नवी दिल्ली :** राष्ट्रीय चाचणी संस्थेने (एनटीए) नीट-यूजी परीक्षेची नवीन तारीख जाहीर केली. ही परीक्षा आता रविवार, २१ जून रोजी होणार आहे, अशी माहिती केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी दिली. पेपरफुटीच्या शक्यतेमुळे एनटीएने १२ मे रोजी ही परीक्षा रद्द केली होती. यापूर्वी ही परीक्षा ३ मे रोजी भारतातील ५५१ आणि परदेशातील १४ शहरांमध्ये घेण्यात आली होती. या परीक्षेसाठी ५,४०० हून अधिक परीक्षा केंद्रे उभारण्यात आली होती. २२.७९ लाख विद्यार्थी परीक्षेला बसले होते.



केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी कबूल करत सांगितले की, '१२ तारखेला जेव्हा आम्हाला पेपरफुटीबद्दल समजले, तेव्हा कोणत्याही चुकीच्या उमेदवाराची निवड होऊ नये असे आम्हाला वाटत होते. त्यामुळे, आम्ही जबाबदारीने सांगितले की आमची शून्य सहनशीलता आहे. असे असूनही, ही घटना घडली. त्यामुळे, आम्ही परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला.'

### परीक्षेच्या वेळेत १५ मिनिटांची वाढ

शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान म्हणाले, 'आम्ही परीक्षेत काही सुधारणा केल्या आहेत. लवकरच होणाऱ्या पुढील परीक्षेचे शुल्क आम्ही परत करणार आहोत. पुढील परीक्षेचे शुल्क शून्य असेल.' जेणेकरून विद्यार्थ्यांवर भार पडणार नाही. ते म्हणाले की, विद्यार्थ्यांना त्यांच्या पसंतीचे शहर निवडण्याचा पर्याय असेल. परीक्षेची वेळ १५ मिनिटांनी वाढवण्यात आली आहे. परीक्षा दुपारी २ वाजता सुरू होईल आणि सायंकाळी ५:१५ पर्यंत चालेल. प्रवेशपत्रे १४ जूनपर्यंत उपलब्ध होतील.

### पेपर लीक प्रकरणात आतापर्यंत ७ जणांना अटक

सीबीआयने या प्रकरणात आतापर्यंत सात जणांना अटक केली आहे. त्यापैकी पाच जणांना, राजस्थानचा मंगीलाल बिनवाल, जामवारामगडचा त्याचा भाऊ दिनेश बिनवाल, मुलगा विकास बिनवाल, हरियाणाच्या गुरुग्रामचा यश यादव आणि नाशिकचा शुभम खैरनार यांना दिल्लीच्या राऊस ॲव्हेन्यू न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने सर्व पाच आरोपींना सात दिवसांची कोठडी सुनावली आहे. याशिवाय, सीबीआयने पुण्यातून ब्युटिशियन मनीषा वाघमारे आणि नाशिकमधून धनंजय लोखंडे यांनाही अटक केली आहे.

# अकोल्यात औषध विक्रेत्यांची मुजोरी !

## २० मे रोजी देशव्यापी संप, पण भरडला जाणार सामान्य रुग्ण

प्रतिनिधी १५ मे

**अकोला :** येत्या २० मे रोजी देशव्यापी केमिस्ट असोसिएशनने संपाची हाक दिली आहे. मात्र, अकोल्यात या संपाच्या आडून 'अकोला केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन'मधील अंतर्गत सत्ताकारण आणि काळे धंदे लपवण्याचा प्रयत्न सुरू असल्याची चर्चा आहे. संपाच्या नावाखाली रुग्णांना वेठीस धरण्याचा हा प्रकार म्हणजे अकोलेकरांच्या जीवाशी खेळ असल्याची संतप्त भावना व्यक्त होत आहे. ऑनलाईन फार्मसीला विरोध आणि इतर विविध मागण्यांसाठी हा देशव्यापी संप पुकारण्यात आला आहे. मात्र, अकोल्यात या संपाचे पडसाद गंभीर उमटण्याची शक्यता आहे. आधीच शहरातील मोठ्या मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल्समध्ये औषधांचा तुटवडा असताना, आता सर्व दुकाने बंद ठेवून रुग्णांना मृत्यूच्या दारात ढकलण्याचे काम हे असोसिएशन करणार का? असा सवाल उपस्थित होत आहे.

### हॉस्पिटल्समध्ये औषधे नाहीत, मग संप कोणासाठी?

अकोल्यातील मोठ्या रुग्णालयांमध्ये अनेकदा जीवनावश्यक औषधे मिळत नाहीत. अशा वेळी होलसेल विक्रेते आणि असोसिएशनने रुग्णांना मदत करणे अपेक्षित आहे. मात्र, प्रत्यक्षात मात्र रुग्णांना वेठीस धरून आपल्या मागण्या मान्य करून घेण्याचा 'ब्लॅकमेलिंग' प्रकार सुरू असल्याचे दिसते. विना-फार्मासिस्ट आणि विना-फ्रिज चालणाऱ्या दुकानांवर एफडीए कारवाई का करत नाही ?. एजंटांची साखळी कोण मोडणार ?. संपाच्या काळात आपत्कालीन औषध पुरवठा सुरू ठेवण्याची आणि बोगस फार्मासिस्टवर कारवाई करण्याची मागणी.अकोल्यातील औषध बाजारातील ही 'अनैसर्गिक' युती आणि रुग्णांची होणारी लूट थांबवण्यासाठी आता प्रशासनाने कडक पावले उचलण्याची वेळ आली आहे!



### अकोल्यात फार्मासिस्ट गायब, एजंटांचा सुळसुळाट!

अकोला जिल्ह्यात आणि शहरात हजारो मेडिकल स्टोअर्स आहेत. नियमानुसार प्रत्येक मेडिकलमध्ये पूर्णवेळ फार्मासिस्ट असणे अनिवार्य आहे. मात्र, वास्तवात अकोल्यात किती फार्मासिस्ट प्रत्यक्ष काम करतात आणि किती केवळ कागदावर आहेत, याची चौकशी होण्याची गरज आहे. अनेक दुकानात फ्रिज नसल्यामुळे तापमानावर आधारित औषधे खराब होत आहेत. फार्मासिस्ट नसताना औषधे देण्याचे 'काळे धंदे' कोणाच्या आशीर्वादाने सुरू आहेत?

### दोन 'बड्या' सचिवांची युती; निवडणुकीचा 'जुगाड'?

केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या आगामी निवडणुकीसाठी अकोल्यातील दोन वजनदार सचिव एकत्र येणार असल्याची खात्रीलायक माहिती आहे. होलसेल आणि रिटेल बाजारातील आपली सत्ता टिकवून ठेवण्यासाठी या दोन नेत्यांनी हातमिळवणी केली आहे. 'सामान्य दुकानदारांच्या हितापेक्षा स्वतःचे 'कमिशन' आणि 'राजकारण' जपण्यासाठी ही युती आहे का?' अशी चर्चा आता औषध बाजारात रंगली आहे.

# अमरावती शिक्षण उपसंचालकांसह तिघांना दंड!

प्रतिनिधी १५ मे

**नागपूर :** अधिकारांचा दुरुपयोग केल्यामुळे अमरावती विभागाचे शिक्षण उपसंचालक, वाशिम जिल्हा परिषदेचे माध्यमिक शिक्षणाधिकारी आणि खासगी तक्रारकर्ते प्रदीप देशमुख यांच्यावर मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने प्रत्येकी दहा हजार याप्रमाणे एकूण ३० हजार रुपयांचा दंड ठोठावला. तसेच, ही रक्कम येत्या ७ जूनपर्यंत जनकल्याण खात्यात जमा करण्याचे निर्देश दिले. न्यायमूर्तिद्वय मुकुलिका जवळकर व नंदेश देशपांडे यांनी हा दणका दिला. प्रदीप देशमुख यांनी वाशिम येथील जनता बहुउद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळाचे मुख्याध्यापक दत्तात्रय कतर, सहायक शिक्षक नरेश चव्हाण व ग्रंथालय सहायक शैलेश चव्हाण यांच्या नियुक्तीविरोधात शिक्षण उपसंचालकांना तक्रार केली होती. शिक्षण उपसंचालकांनी त्या तक्रारीची दखल घेऊन तिन्ही कर्मचाऱ्यांना ३१ ऑक्टोबर २०२३ रोजी सुनावणीसाठी बोलावले. परंतु, संबंधित नोटीसमध्ये सुनावणीची कारणे दिली नाही. तसेच, कर्मचाऱ्यांना तक्रारीची प्रतही नाकारली. याशिवाय, त्याच दिवशी २० टक्के अनुदानाला स्थगिती दिली. त्यामुळे संस्थेने व कर्मचाऱ्यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. ती याचिका प्रलंबित असताना शिक्षण उपसंचालकांनी १२ डिसेंबर २०२३ रोजी शैलेश चव्हाण यांच्या नियुक्तीची मान्यताही रद्द केली. न्यायालयाने विविध कायदेशीर बाबी विचारात घेता सर्व प्रकारचे वादग्रस्त आदेश व कारवाई अवैध ठरवून रद्द केली.




# अकोल्यासह अमरावती, वर्ध्यात उष्णतेचा येलो अलर्ट !

## उन्हामुळे काहिली ; नागपूरसह पाच जिल्ह्यांना अवकाळी पावसाचा येलो अलर्ट

प्रतिनिधी १५ मे

**अकोला :** विदर्भात एकाच वेळी निसर्गाचा विचित्र खेळ अनुभवास मिळत आहे. हवामान विभागाने जारी केलेले अर्लट नुसार अकोला, अमरावती आणि वर्धा जिल्ह्याला उष्णतेचा तर नागपूरसह पाच जिल्ह्यांना अवकाळी पावसाचा येलो अर्लट दिला आहे. एकीकडे उन्हाच्या काहिलीमुळे अकोलेकरांचे जगणे असह्य झाले आहेत तर दुसरीकडे अवकाळीमुळे शेतकऱ्यांच्या फळ व भाजीपाला पिकांचे नुकसान होण्याची शक्यता आहे.

राज्यातील बहुतांश जिल्ह्यांना तीव्र उन्हाचा फटका बसत असताना अवकाळी पावसाने एकच दाणादाण उडवली आहे. या अवकाळी पावसाचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसला आहे. अशातच आता विदर्भाला हवामान विभागाने एक महत्वपूर्ण अर्लट जरी केला आहे. हवामान विभागाने वर्तविलेल्या अंदाजानुसार, विदर्भातल्या अकोला, अमरावती आणि वर्धा या तीन जिल्ह्यासाठी नागपूर वेध शाळेने उष्णतेच्या लाटेचा येलो अलर्ट जाहीर केला आहे. या तीन जिल्ह्यातील नागरिकांनी दुपारच्या वेळेला घराबाहेर पडतांना काळजी घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे. दुसरीकडे, या व्यतिरिक्त नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली या पाच जिल्ह्यांना वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला आहे. त्यामुळे सध्या विदर्भातील नागरिकांना उष्णेतीची लाटेसह, अवकाळी पाऊस आणि उकाडा अशा दुहेरी त्रासाचा सामना करावा लागणार आहे.



### ६ जून रोजी कोकणात मान्सूनचे आगमन होणार

भारतीय हवामान खात्याने नैर्ऋत्य मान्सून आगमनचा अंदाज वर्तवला आहे. अनुकूल हवामान परिस्थिती असल्याने ६ जून रोजी कोकणात मान्सूनचे आगमन होणार असून, त्यामुळे मोठा दिलासा मिळणार आहे. नैर्ऋत्य मान्सून दक्षिण अंदमान समुद्र, बंगालचा उपसागरातील काही भाग आणि निकोबारांच्या बेटांवर पुढील ४८ तासात दाखल होण्यासाठी अनुकूल वातावरण आहे. त्यामुळे केरळ आणि राज्यात देखील मान्सून वेळेवर दाखल होण्याचा अंदाज आहे.

### अमरावतीसह ग्रामीण भागाचा पाणीपुरवठा बंद

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील तब्बल १८.८१ कोटी रुपयांची प्रलंबित देयके न मिळाल्याने अमरावती जिल्हा जीवन प्राधिकरण कंत्राटदार असोसिएशनने देयकांच्या मागणीसाठी ६ मेपासून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अमरावती कार्यालयासमोर बेमुदत ठिय्या आंदोलन सुरू केले आहे. आठ दिवस उलटून अद्यापपर्यंत अधिकारी किंवा शासनाने आंदोलनाची कुठलीही दखल घेतलेली नाही. परिणामी कंत्राटदार असोसिएशनने आंदोलन तीव्र केले असून आजपासून पाणीपुरवठा देखभाल व दुरुस्तीची सर्व कामे बंद करण्याचा इशारा दिला होता. आता सगळे असोसिएशनचे कंत्राटदार आणि त्यांचे कर्मचारी आंदोलनस्थळी व्हॉल्व ऑपरेशन स्पॅणर घेऊन दाखल झाले आहेत. त्यांनी आमचे १८ कोटी रुपयांचे देयके मिळत नाही तोपर्यंत आम्ही अमरावती शहरात पाणीपुरवठा सुरू करणार नाही,' असा इशारा सरकारला दिला आहे. या आंदोलनाचा अमरावती जिल्ह्यातील ग्रामीण भागातील ३५४ गावातील आणि अमरावती शहरासह दर्यापूर, अंजनगाव सुर्जी आणि चिखलदरा शहराचा देखील पाणीपुरवठा आजपासून बंद करण्यात आला आहे.

### अवकाळी पावसाचा धान पिकाला फटका

गोंदिया जिल्ह्यात गेल्या काही दिवसापासून सायंकाळच्या वेळेस वादळी वारा आणि गारपिटीसह पाऊस पडला. यामध्ये गोंदिया जिल्ह्यातील मुख्य पीक असलेल्या रब्बी हंगामातील धान पिकाला सगळ्यात जास्त नुकसान झाल्याचे दिसून आले आहे. गोंदिया जिल्ह्यातील आठही तालुक्याला याचा फटका बसला असून जवळपास ३००० शेतकरी यांचे १४७३ हेक्टर वरील धान पिकाला नुकसान झाले. त्यामुळे एका बाजूला हवालदिल झालेल्या शेतकऱ्याला पुन्हा या गारपिटी आणि वादळ वाऱ्याचा मार सहन करावा लागत आहे. सध्या या नुकसानीचे पंचनामे हे कृषी विभाग, ग्रामविकास विभाग आणि महसूल विभागाद्वारा संयुक्त रित्या करण्यात येत आहेत.

CMYK

भारतीय संविधानाला अभिप्रेत शासन व्यवस्था ही लोकशाही, प्रजासत्ताक, कल्याणकारी आणि संघराज्यीय स्वरूपाची असून ती न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांवर आधारित आहे. मात्र गेल्या ७५ वर्षाच्या लोकशाहीत शासनकर्त्यांनी संविधानाला अभिप्रेत असलेली शासनव्यवस्था निर्माण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केल्याचे दिसत नाही. त्यामुळे देशात कधी घराणेशाही तर कधी एकपक्षीय हुकूमशाही व्यवस्था राबविल्या गेली. परिणामी लोकशाहीची मूल्ये लोकांची जीवनमूल्ये होऊ शकली नाहीत आणि लोकशाही दृढ होण्याऐवजी खिळखिळी झाली. आज आपल्या देशाच्या लोकशाहीला ७५ वर्षे पूर्ण झाली असून देशात लोकशाहीच्या नावाखाली हुकूमशाहीचा जोर वाढला आहे. म्हणून आता 'हुकूमशाही जोरात आणि लोकशाही कोमात' असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. पण दुःख याचं आहे की, ज्यांच्यासाठी लोकशाही आहे ते लोकंच हुकुमशाहीचे समर्थक होत आहेत, ही लोकशाहीची सर्वात मोठी शोकांतिका आहे.

# पंतप्रधानांनी केलेले आवाहन आणि राज्यकर्ते...!

प्रा.डॉ.एम.आर.इंगळे
सेवानिवृत्त प्रोफेसर

**पंतप्रधानांनी केलेले आवाहनः**

सध्या इराण, इस्त्रायल व अमेरिका यांच्यात सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थीमुळे जगावर आर्थिक संकट कोसळले आहे. त्याचा भारतीय अर्थव्यवस्थेवर देखील प्रतिकूल परिणाम झाला असून देशात गॅस, पेट्रोल, डिझेल इत्यादीचा तुटवडा निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर पंतप्रधानांनी देशाच्या जनतेला आवाहन केले की, 'शक्य तिथे पेट्रोल डिझेलचा वापर कमी करून मेट्रो, इलेक्ट्रिक बस, सार्वजनिक वाहतुकीला प्राधान्य द्या. परदेशात राहणाऱ्या भारतीयांनी किमान पाच विदेशी पाहुण्यांना भारत भेटसाठी आणावे, परिस्थिती सामान्य होईपर्यंत सोन्याची खरेदी टाळून परकीय चलनाची बचत करा. खाद्यतेलाचा वापर मर्यादित करा. परदेशी वस्तूंऐवजी स्थानिक उत्पादनांचा स्वीकार करा. जिथे शक्य आहे तिथे कर्मचाऱ्यांनी घरून काम करावे. शाळांनी ऑनलाईन क्लासेस चालू करावे, प्रत्येकाने संसाधनांचा संयम व जबाबदारीने वापर करावा. व्होकल फॉर लोकलला प्रोत्साहन द्या.' इत्यादी. पंतप्रधानांनी नागरिकांना केलेल्या आवाहनाबद्दल असे म्हटले जात आहे की, 'ही केवळ आर्थिक अडचण नसून भारतासाठी स्वावलंबन आणि आर्थिक स्थिरता मजबूत करणारी संधी आहे. यामुळे स्वदेशी गुंतवणुकीला चालना, परकीय चलन साठ्याचे रक्षण होईल. भारताला कच्चे तेल आणि सोन्यासाठी डॉलर मध्ये पेमेंट करावे लागते. जर नागरिकांनी एक वर्ष सोने खरेदी टाळली तर भारताचे लाखो कोटी रुपये वाचू शकतात.' खरेच असं होत असेल तर त्यांच्या आवाहनाचे स्वागत आहे.

**पंतप्रधानांचे आवाहन आणि राज्यकर्ते :**

पंतप्रधान यांनी केलेले आवाहन नागरिकांसाठी आहे, ते आपल्यासाठी नाही कारण आपण नागरिक नाही तर राज्यकर्ते आहोत असा समज अलिकडे राजकारण्यांमध्ये दृढ झाल्याचे दिसते. कारण पंतप्रधानांनी आवाहन केल्यानंतरही भाजप नेते सौभाग्य सिंह ठाकूर यांनी मध्य प्रदेश पाठ्यपुस्तक निगमच्या अध्यक्षपदाचा पदभार स्वीकारण्यासाठी उज्जैन ते भोपाळ असा जवळपास ७०० गाड्यांचा ताफा काढून मोठे शक्तिप्रदर्शन केल्याचे आणि मुंबईत भाजप अध्यक्ष अमित साटम यांनी नालेसफाईचा दौरा केला त्यात तब्बल २५ गाड्यांचा ताफा होता असे वृत्त आहे. तसेच आता पंतप्रधानांनी आपल्या दौऱ्याचा ताफा कमी केला असून मंत्र्यांना विदेश दौरे न करण्याचे फर्मान सोडले आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांनी देखील मंत्र्यांचे विदेश दौरे रद्द केले असून आपल्यासह सर्व मंत्र्यांसोबत असणारा फौज फाटा कमी केल्याचे वृतांत प्रसिद्ध होत आहेत. याचा अर्थ आजपर्यंत पंतप्रधान, मुख्यमंत्री, मंत्री, आमदार, खासदार यांच्या सोबत अनावश्यक फौजफाटा वापरला जायचा आणि त्यांच्या विदेश दौऱ्यावर अवाजवी उधळपट्टी केली जायची असेच म्हणावे लागेल.मराठीत 'लोका सांगे ब्रह्मज्ञान अन् आपलेच कोरडे पाषाण'

**अशी एक सुप्रसिद्ध म्हण आहे.**

त्याचा परिचय राज्यकर्त्यांकडून सातत्याने येत असतो. संकटकाळात जनतेनेच सहकार्य करावे, त्यांनीच काटकसर करावी, त्यांनीच संसाधनांचा वापर संयम व जबाबदारीने करावा असे आवाहन केले जाते. मात्र राज्यकर्ते आणि राजकारणी व प्रशासकीय अधिकाऱ्यांनी जनतेच्या पैशाची लूट सुरूच ठेवावी हा उरफाटा न्याय नाही का?

**बेजबाबदारपणे खर्च करण्याची वृत्ती:**

भारत अजूनही विकसनशील राष्ट्र असून २०२४-२५ नुसार देशातील लोकांचे सरासरी दरडोई वार्षिक उत्पन्न केवळ २.०५ ते २.४ म्हणजे मासिक १७००० ते २४००० रुपये इतके कमी आहे. त्यामुळे जवळपास ८० ते ८५ टक्के लोकांजवळ आपला चरितार्थ चालविण्याइतके देखील उत्पन्न नाही, त्यामुळे ते कोणताही फालतू खर्च करत नाहीत. कारण त्यांचा कष्टाचा आणि घामाचा पैसा त्यांच्या जीवन जगण्यासाठी आवश्यक बाबींवरच खर्च होतो.

मात्र देशातील सर्वच राजकारणी सरकारच्या तिजोरीतून उधळपट्टी करतात. सरकारी पैशातून आलिशान गाड्यांमधून फिरतात. फालतू दौरे काढून आपल्या सोबत पोलिस यंत्रणा व प्रशासकीय अधिकाऱ्यांचा ताफा मिरवतात म्हणजे बेजबाबदारपणे खर्च करण्याची वृत्ती राजकारण्यांमध्ये असते सामान्य नागरिकांमध्ये नाही, हे वास्तव आहे.

**सत्य उघड झाले:**

पंतप्रधानांनी केलेल्या आवाहनामुळे एक चांगली गोष्ट झाली की, लोकांना मंत्री, आमदार, खासदार, मुख्यमंत्री, पंतप्रधान सरकारी पैशातून हजारो कोटी रुपये परदेश दौऱ्यावर खर्च करतात. त्यात आपल्या कुटुंबासह इतर नातेवाईक यांनाही परदेश वारी घडवितात हे सत्य उघड झाले आहे. काही अपवाद सोडले तर या परदेश दौऱ्यातून देशातील लोकांचे खरेच किती हित झाले ? हा प्रश्न गुलदस्त्यात आहे. दुसरे म्हणजे जर आपल्याला परदेशी वस्तूंऐवजी स्थानिक उत्पादनांचा स्वीकार करायचा असेल, व्होकल फॉर लोकलला प्रोत्साहन द्यायचे असेल आणि भारताला स्वावलंबन आणि आर्थिक स्थिरता द्यायची असेल तर देशात लघु व मध्यम उद्योगांना प्रोत्साहन द्यावे, स्थानिक पातळीवर शेती उत्पादनावर आधारित उद्योगांची निर्मिती करावी, कुटीर व गृह उद्योगांना चालना द्यावी आणि त्यासाठी परदेश नव्हे तर देशांतर्गत दौरे करून परिस्थितीचा अभ्यास करावा लागेल. पण राज्यकर्ते स्वतःला राजे किंवा हुकुमशहा समजून सरकारी पैशातून विदेश दौरे व मौज मजा आणि ऐश करतात आणि ज्यांच्या उत्पन्नातून तिजोरी भरते त्यांनाच शहाणपणाचे धडे देतात. हा विरोधाभास नाही का?

**व्हीआयपी संस्कृती लोकशाहीला घातक:**

सरकार मग ते केंद्र असो की राज्य नेहमी लोकांनाच वेठीस धरतात. त्यांचे दौरे, सभा, कार्यक्रम असले की त्यांच्या संरक्षासाठी पोलिस आणि त्यांची वाट मोकळी करण्यासाठी वाहतूक पोलिसांचा फार मोठा ताफा मागे पुढे असतो. ते ज्या शहरात जातात तेथील रस्त्यांवरील वाहतूक यांच्या ताफ्यासाठी अडवून ठेवली जाते. मग नागरिकांना कितीही त्रास होवो किंवा ते मरो यांना काहीही फरक पडत नाही. आपल्या देशात या राजकारण्यांनी आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांनी जी व्हीआयपी संस्कृती निर्माण केली तीच देशाला आणि लोकशाहीला घातक आहे. या संस्कृतीमुळे मूठभर लोकं सत्तेचा गैरवापर करतात तर देशाचे खरे मालक म्हणजे नागरिक गुलामसारखे जगतात. यासाठी लोकं जबाबदार आहेत कारण त्यांच्यात संवैधानिक जागृतीचा अभाव व नागरिक म्हणून आपली कर्तव्ये व जबाबदारी पार पाडण्याची समजदारी नाही. ही लोकशाहीची व संविधानाची विटंबनाच नव्हे काय...?

## दिन विशेष

### समकालीन स्त्री जीवनाचे वास्तव वर्णन करणारी कवयित्री !

### संत जनाबाई यांची आज पुण्यतिथी



संत जनाबाई (अंदाजे १२५८ - १३५०) या हिंदू परंपरेतील एक मराठी संत कवयित्री होत्या. त्यांचा जन्म १३ व्या शतकाच्या सातव्या किंवा आठव्या दशकात झाला होता. महाराष्ट्रातील गंगाखेड येथील दमा आणि करुंड यांच्या पोटी जनाबाईंचा जन्म झाला. जातिव्यवस्थेखाली हे जोडपे मातंग समाजाचे होते. आई वारल्यानंतर त्यांचे वडील जनाबाईंना पंढरपूरला घेऊन गेले. लहानपणापासून जनाबाईंनी पंढरपूर येथे राहणाऱ्या दामाशेट (संत नामदेव यांचे वडील) यांच्या घरात मोलकरीण म्हणून काम केले. जनाबाई बहुधा नामदेवांपेक्षा थोड्या मोठ्या होत्या आणि अनेक वर्षे त्यांचे पालन पोषण करत होत्या.

जनाबाईंचे मालक दामाशेट आणि त्यांची पत्नी गोणाई हे अतिशय धार्मिक होते. सभोवतालच्या धार्मिक वातावरणाच्या प्रभावामुळे आणि जन्मजात प्रवृत्तीमुळे जनाबाई नेहमीच विठ्ठलाच्या निस्सीम भक्त होत्या. त्या प्रतिभावान कवयित्रीही होत्या. कोणतेही औपचारिक शालेय शिक्षण घेतले नसले तरी त्यांनी अभंग प्रकारातील अनेक उच्च दर्जाचे धार्मिक श्लोक रचले. नामदेवांच्या रचनांसह त्यांच्या काही रचना जतन करण्यात आल्या होत्या. सुमारे ३०० अभंगांचे लेखन परंपरेने जनाबाईंनी केल्याचे सांगितले जाते. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ आणि संत तुकाराम यांच्याबरोबरच महाराष्ट्रातील वारकरी पंथातील हिंदूंच्या मनात जनाबाईंना आदराचे स्थान आहे.

जनाबाईंचा जन्म परभणी येथील गंगाखेड येथील दमा नावाच्या विठ्ठलभक्ताच्या घरी झाला. जनाबाईंच्या एका अभंगातील 'माझ्या वडिलांचे दैवत। तो हा पंढरीनाथ ॥' या ओळींवरून त्यांचे वडील दमा हेदेखील वारकरी असावेत, अशी शक्यता दिसते. त्यांच्या आईचे नाव करुंड. त्याही भगवद्भक्त होत्या. संत जनाबाई या संत कवयित्री म्हणून जनमानसात लोकप्रिय आहेत. महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यातून स्त्रिया जात्यावर दळण दळताना, कांडताना त्यांच्या ओव्या गातात. परभणी जिल्ह्यातील गोदावरीच्या तीरावरील गंगाखेड हे जनाबाईंचे गाव होते. जनाबाई पाच-सहा वर्षांच्या असतानाच त्यांच्या वडिलांनी जनाबाईला नामदेवांचे वडील दामाशेट शिंपी यांच्याकडे पाठवले. नामदेवांचे आई-वडील, थोरली बहीण, पत्नी, चार मुलगे, चार सुना, एक मुलगी, संत जनाबाई व संत नामदेव असे पंधरा माणसांचे हे कुटुंब होते. जनाबाई या संत नामदेव यांच्या कुटुंबीयांतील एक घटक बनल्या. त्या स्वतःला नामयाची दासी म्हणवून घेत असत.

संत नामदेवांच्या सहवासात जनाबाईंनीही विठ्ठलाच्या भक्तीचा ध्यास घेतला होता. 'दळिता कांडिता तुज गाईन अनंता' असे त्या म्हणत असत.

संत नामदेव हेच त्यांचे पारमार्थिक गुरू होते. श्री संत ज्ञानदेव-विसोबा खेचर-संत नामदेव-संत जनाबाई अशी त्यांची गुरुपरंपरा आहे. संत ज्ञानदेवांच्या प्रभावळीतील सर्व संतांना त्यांनी प्रत्यक्ष पाहिलेले आहे. 'विठू माझा लेकुरवाळा। संगे गोपाळांचा मेळा।।' हा प्रसिद्ध अभंग जनाबाईंचाच आहे. त्यांना संत नामदेवांमुळे सतत संत-संग घडला होता. संत ज्ञानदेवांविषयीही त्यांचा भक्तिभाव अनन्यसाधारण होता. 'परलोकीचे तारू। म्हणे माझा ज्ञानेश्वरू।' असे त्यांनी ज्ञानेश्वरांविषयी म्हणले आहे. गवऱ्या-शेण्या वेचताना, घरातील इतर कामे करत असताना त्या सतत देवाचे नामस्मरण करत असत.

संत जनाबाईंच्या नावावर असलेले एकूण सुमारे ३५० अभंग सकल संत गाथा या ग्रंथात मुद्रित झाले आहेत. संत जनाबाईंचे बरेचसे अभंग नामदेव गाथेमध्ये आहेत. त्यांचे अभंग कृष्णजन्म, थाळीपाक, प्रल्हादचरित्र, बालक्रीडा या विषयांवर आहेत. हरिश्चंद्राख्यान नामक आख्यानरचनापण त्यांच्या नावावर आहे. संत जनाबाईंच्या थाळीपाक व द्रौपदी स्वयंवर या विषयांवरील अभंगांनी महाकवी मुक्तेश्वरांना (संत एकनाथांचे नातू) स्फूर्ती मिळाली होती. संत जनाबाईंची भावकविता ही भगवंताच्या प्रेमाने ओतप्रेत भरलेली आहे. पूर्ण निष्काम होऊन लौकिक, ऐहिक भावना विसरून त्या विठ्ठलाला शरण गेलेल्या आहेत. आत्मज्ञानाचा साक्षात्कार घडण्यापूर्वीच त्या निर्विकार झाल्या आहेत. संत जनाबाईंच्या जीवनातील अनंत अनुभूती त्यांनी त्यांच्या रचनांतून रेखाटल्या आहेत. संत नामदेवांवरील भक्ती-प्रेमभाव, संत ज्ञानदेवांविषयी असलेला उत्कट भाव, संत चोखोबांच्या भावसामर्थ्याचे अनुसरण, तसेच विठ्ठलाविषयीचा भक्तिभाव त्यांच्या काव्यात ओतप्रोत भरलेला दिसून येतो. वेळप्रसंगी देवाशी भांडायला पण त्या कमी करत नाहीत. 'वात्सल्य, कोमल ऋजुता, सहनशीलता, त्यागी वृत्ती, समर्पण वृत्ती, स्त्री-विषयीच्या भावना संत जनाबाईंच्या काव्यात प्रकर्षाने दिसून येतात.' असे ज्येष्ठ अभ्यासक रा. चिं. ढेरे हे जनाबाईंच्या काव्याचे रसग्रहण करताना म्हणतात.संत जनाबाईंच्या अभंगांचे वर्गीकरण- भक्तीपर अभंग - एकूण अभंग १५५. परमार्थ जीवन - एकूण अभंग ५६. संतमहिमा - एकूण अभंग ४८. आख्यानपर रचना - एकूण अभंग ४५. स्फुट काव्यरचना - एकूण अभंग ११. हितवचने - एकूण अभंग ३२. असे करण्यात आले आहे.

# स्मृती, संघर्ष आणि समजुतीचा प्रवास



## आंतरराष्ट्रीय कुटुंब दिन

सीमा बक्षी
अकोला



आज सोशल मीडियावर 'एकत्र कुटुंब व्यवस्था' या विषयावर मोठ्या प्रमाणात सजावट केलेला लेखनप्रपंच अवतरला आहे. 'गतकाळ', 'स्मृतीपटल', 'आजीच्या हातचं लोणचं', 'उन्हाळे-पावसाळे', 'वाळवण', 'लग्नपंगती', 'एकत्र जेवणं' अशा शब्दांनी नटलेल्या पोस्ट्स सर्वत्र फिरत आहेत. अगदी ज्यांच्या चौकोनी कुटुंबात गेल्या अनेक वर्षांपासून चार थाळ्यांव्यतिरिक्त पाचव्या थाळीने जेवणाचा टेबल पाहिलेला नाही, त्यांच्याही भावनिक पोस्ट्स येऊन पडतील आणि आपण पुन्हा एकदा त्या जुन्या आठवणींमध्ये रममाण होऊ.

पण या सगळ्या भावनिक धुक्यात एक मूळ मुद्दा मात्र हरवून जातो. एकत्र कुटुंब ही फक्त सुंदर कल्पना नाही, ती एक कठीण साधना आहे. मला स्वतःला नेहमी वाटतं, 'एकत्र कुटुंब ही प्रत्यक्षाहून उत्कट कल्पना आहे; पण वास्तवात ती आपल्याला आदर्श व्यक्ती घडवणारी परीक्षाच आहे.' कष्ट, त्याग, धैर्य, संयम, प्रेम, समजूतदारपणा, भक्ती हे गुण पुस्तकं वाचून मिळत नाहीत. ते एकत्र कुटुंबात राहून नकळत अंगी यावे लागतात. एकत्र कुटुंबात राहणं म्हणजे रोज आनंदाची फुलं उधळणं नाही. तर स्वतः सोबत इतरांनाही प्राधान्य देणं. पूर्वी एकत्र कुटुंब म्हणजे सासू-सासरे, दीर-जावा, नणंदा-भावजय सगळे सोबत राहत. आता तर सासू-सासरे आणि लेक-सून सोबत राहणे म्हणजे संयुक्त कुटुंब ! कारण 'घरातली माणसं जर एकमेकांना समजून घेत असतील तर चंद्रमौळी सुद्धा इंद्रप्रस्थ वाटतं.'

एकत्र कुटुंबात जेव्हा नव्याने सुनेचा प्रवेश होतो, तेव्हा सुरुवातीला सासू-सासरे आणि सून यांच्या मनात परस्परांविषयी अपरिचितपणा असतो. 'ही आपली आहे का?' 'मला स्वीकारलं जाईल का?' 'आपले स्वभाव जुळतील का?' इथपासून सुरू झालेला प्रवास, 'तु मला आवडतेस' 'किती लोभस आहेस तु' इथपर्यंत पोहोचणं दोन्ही बाजूंनी तितकंच कठीण असतं.

आजकालची मुलं-मुली, सुना-जावई शिक्षण, नोकरी, व्यवसाय यासाठी मूळ गावापासून दूर राहतात. कित्येक जण परदेशात स्थायिक आहेत. त्यामुळे वर्षातून एक-दोन वेळाच सगळे एकत्र येतात. आणि त्या काही दिवसांतही एकमेकांचे गुणदोष जाणवतात, काही गोष्टी खटकतात, मतभेद होतात. पण तरीही आज अनेक घरांमध्ये असेही लेक-सून आहेत, जे आनंदाने स्वतःला एकत्रित समायोजित करतात. वास्तविक त्यांना ठाऊक असते की एकत्र कुटुंब म्हणजे स्वैराचार नाही. तर स्वातंत्र्याची जपणूक करत सहजीवन जगणं आहे. पण बहुतेक त्यांनी आत्मसात केले असते.

ना बादलों की छाँव में, ना चांदनी के गाँव में
ना फूल जैसे रास्ते, बने हैं इसके वास्ते
मगर ये घर अजीब है, ज़मीन के करीब है
ये ईंट-पत्थरों का घर, हमारी हसरतों का घर

अनेक सासू-सासरे आहेत, जे नियंत्रण नाही तर स्वीकार शिकतात.

केवळ एवढेच नव्हे तर सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत प्रत्येक व्यक्ती हा पिढीने, विचारांनी, अस्तित्वाने आणि कर्तृत्वाने वेगळा असतो. आणि विभक्त आचारविचारांच्या या जगात संयुक्त कुटुंबात राहणाऱ्या आपल्या लेकी-सुनांचे, मुला-जावयाचे जाहीर कौतुक तर आजच्या दिवशी करायलाच हवे. आमच्या घरातही आम्ही चौघं.. मी, माझे पती, मुलगा आणि सून. प्रत्येक जण स्वतःच्या विश्वात व्यस्त. कोचिंग क्लासेस, अंकज्योतिष शास्त्र, रेस्टॉरंट, सामाजिक उपक्रम, झुंबा क्लासेस, दिवसभर प्रत्येकाची धावपळ सुरू असते. माझी सून प्रत्येक सांस्कृतिक आणि सामाजिक कार्यक्रमात आमच्यासोबत उत्साहाने सहभागी होते. नाटकं, गाण्यांचे कार्यक्रम, पुस्तक प्रकाशन सोहळे तिला सगळंच आवडतं. आमच्या मुलाला मात्र या गोष्टींमध्ये फारशी रुची नाही. व्यवसायाच्या व्यापामुळे इच्छा असूनही त्याला वेळ देता येत नाही. अशावेळी सामंजस्य फार गरजेचं असतं. कारण नातं टिकवण्यासाठी सारखं असणं गरजेचं नसतं. तर वेगळेपण स्वीकारणं गरजेचं असतं. वेळ मिळाला की ते दोघं प्लेस्टेशन खेळतात, वेब सिरीज पाहतात, सिनेमांचा आनंद घेतात. आणि आम्ही सासू-सूनही सहवासातून एकमेकींना समजून घ्यायला शिकलो आहोत. अर्थात रेणूची म्हणजेच माझ्या सुनेची करावी तेवढी प्रशंसा कमीच किंबहुना अशा सर्वच मुलींची ज्या एकत्रित गुण्यागोविंदाने नांदतात. नवऱ्याचा व्यवसाय, त्याचे कार्यबाहुल्य लक्षात घेऊन ती स्वतःचा व्यवसाय, आवडीनिवडी तर जपते आहेच शिवाय समाजात सुद्धा आपली छाप उमटवण्यासाठी धडपडते आहे.

आजच्या काळात सासू-सुनेच्या नात्यावर सर्वाधिक चर्चा होते. विनोद होतात. मालिका बनतात. मीम्स तयार होतात. पण खरं सांगायचं तर सासू आणि सून या दोघीही चुकीच्या नसतात. दोघींच्या भीती वेगळ्या असतात.

सासूला वाटतं. 'ज्या मुलाला आयुष्यभर जपलं, तो आता दूर तर जाणार नाही ना?' आणि सुनेला वाटतं या घरात मला माझ्या अस्तित्वासह स्वीकारलं जाईल का?' इथून संघर्ष सुरू होतो. एकीकडे अनुभव असतो दुसरीकडे नवी स्वप्नं असतात. एकीकडे 'आमच्या वेळेस' असतं दुसरीकडे 'आता काळ बदललाय' असतं. आणि मग मतभेद होतात. पण घर तुटत नाही मतभेदांनी घर तुटतं संवाद संपल्यावर. 'एकत्र कुटुंब म्हणजे रोज एकमत होणं नाही.तर मतभेद असूनही एकमेकांचा हात न सोडणं आहे.'

जो चांदनी नहीं तो क्या, ये रौशनी है प्यार की
दिलों के फूल खिल गए, तो फ़िक्र क्या बहार की
हमारे घर ना आएगी, कभी खुशी उधार की
हमारी राहतों का घर, हमारी चाहतों का घर

आम्ही आता सगळे एकत्रित 'दीड वर्षांचे' झालो. आणि या दीड वर्षांत एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली 'नातं टिकवण्यासाठी सारखं असणं गरजेचं नसतं तर वेगळेपण स्वीकारणं गरजेचं असतं.' आम्ही सासू-सूनही या दीड वर्षांत एकमेकींना समजून घ्यायला शिकलो. कधी मतभेद झाले, कधी एखादं वाक्य टोचलं, कधी भयाण शांतताही पसरली, पण आम्ही एक गोष्ट जपली. मनभेद होऊ दिले नाहीत. आजच्या काळात आदर्श कुटुंब म्हणजे काय? जिथे सून ही 'फक्त मुलाची बायको' नसते. जिथे सासू ही 'फक्त नवऱ्याची आई' नसते. जिथे मुलं आई-वडिलांना ओझं समजत नाहीत. आणि आई-वडील मुलांच्या आयुष्यावर मालकी गाजवत नाहीत. जिथे मुलगी-जावई घरात येतात. पण हस्तक्षेप नाही, फक्त आपुलकी असते. जिथे 'मी' पेक्षा 'आपण' मोठं असतं. आणि म्हणूनच हे काही शब्द मनाला फार जवळचे वाटतात.

'यहाँ महक वफ़ाओं की, मुहब्बतों का रंग है,
ये घर तुम्हारा ख्वाब है, ये घर मेरी उमँग हैष्ठ
ना आरज़ू पे कैद है, ना हौसले पे ज़ंग है,
हमारे हौसलों का घर, हमारी हिम्मतों का घरष्ठ'

'एकत्र कुटुंब म्हणजे चार माणसं एका घरात राहणं नाही तर चार वेगवेगळ्या स्वभावांना एकमेकांच्या मनात जागा राखून ठेवणं आहे. घर टिकवण्यासाठी मोठमोठ्या तत्त्वज्ञानाची गरज नसते. गरज असते ती, थोडा संयम, थोडा आदर, थोडी मोकळी जागा आणि मनमोकळा संवादाची.

## जाहीर सुचना

या जाहीर सुचनेव्दारे सुचित करतो की, माझे पक्षकार नितीन वसंतकुमार अग्रवाल, रा. बिरला गेट नं. २, ता. जि. अकोला यांनी केलेल्या ईसारचिठ्ठी नुसार मौजे उमरी, ता.. जि. अकोला येथील सर्व्हे नं. ६०.६१ व ६२ व नझुल शीट नं. ७४/अ. ७४/ब व ६२/ड. वरील नझुल प्लॉट नं १/१८,४/१,१/८,३/३, ३/९.२/२० /१२४, नझुल प्लॉट नं ३/३,४/१,१/८,१/१८,३/९,२/२०/१२५ व नझुल प्लॉट नं ३/३,४/१,१/८,१/१८,३/९,२/२०/१२६ (नगर भूमापन नं. १२४,१२५ व १२६), प्लॉट नं. १२१,१२२ व १२३ भाग याचे एकुण क्षेत्रफळ ४५०.०० चौ.फु. यावर बांधण्यात आलेल्या श्री. क्रीष्णा विहार या स्कीम मधील तळ मजल्यावरील **अपार्टमेंट नं. ४** याचे क्षेत्र ८७.६४ चौ.फु. ही मिळकत पूर्वा जयवंत जोत यांचे कडून विकत घेण्याचा सौदा केलेला आहे आणि सदर **अपार्टमेंट नं. ४** हा पुर्वा जयवंत जोत यांचे वडील जयवंत दिगंबरपंत जोत यांच्या मालकीत व तब्यात दि. १५/०२/२००१ रोजीचे खरेदी दस्त क्र. १०१३ नुसार होता व त्यांच्या मुत्यु पच्छात पुर्वा जयवंत जोत यांच्या मालकीत व ताब्यात आहे.

परंतु माझ्या पक्षकाराचे विक्रेते, पुर्वा जयवंत जोत यांचे कडून **दि. १५/०२/२००१ रोजीचे खरेदी दस्त क्र. १०१३ व दि. १४/११/२००० रोजीचे खरेदी दस्त क्र. ६२७४ चे मुळ रजि. दस्त,** गहाळ झालेले आहेत..

तरी याबाबत कोणाचेही, कोणत्याही प्रकारचे कर्ज, गहाण, बोजा, हक्क, हितंसंबंध व इतर कोणतीही भानगड, कायदेशीर वाद, लवाद, दावा असल्यास किंवा त्याबाबत कोणतीही हरकत असल्यास जाहीर सुचनेपासून ७ दिवसांचे आंत खालील पत्त्यावर लेखी स्वरुपात संपर्क साधावा, त्यानंतर आक्षेप आल्यास याची नोंद घेतली जाणार नाही.

अमरावती,
दिनांकः१४/०५/२०२६

**ॲड. राहूल व्ही. मोहोड**
प्रेरणा कॉलनी,
राधा नगर, अमरावती-४४४६०३.
मो.९०९६४६०६७०

## साहित्यिक, लेखकांना आवाहन

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर **८३९०६७०९९९** या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा.
त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल. या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

## जिल्हा परिषद विद्या मंदिर फार्म, हाता ता. बाळापुर जि. अकोला येथील शेतजमीन फेर लिलाव

विद्या मंदिर फार्म हाता ता. बाळापुर येथील गट क. ५६७ (४० एकर) या गटातील एकूण ४० एकर शेतजमीन चा फेर जाहीर लीलाव सन २०२६-२७ या वर्षाकरिता घेण्यात येत आहे. सदर शेतजमीन हि लिलावाच्या दिनांकापासून ते ३१/०३/२०२७ पर्यंत वाहितीसाठी भाडेपट्टीवर द्यावयाचे आहे. त्या करिता मौजे हाता ता. बाळापुर येथील शेतजमिनीचा फेर जाहीर लिलाव दिनांक २०/०५/२०२६ ला सकाळी ११.०० वाजता संविधान भवन, जिल्हा परिषद सिविल लाईन चौक अकोला घेण्यात येईल. जाहीर लिलावामध्ये भाग घेऊ इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांनी खालील अटी व शर्ती मान्य असल्यास लिलावाच्या दिवशी ठरलेल्या ठिकाणी व वेळेवर उपस्थित राहावे.

### जाहीर लिलाव अट व शर्ती

१. लिलावात भाग घेण्यापूर्वी शेतकऱ्यांस लिलाव अधिकारी पांचे जवळ अनामत रक्कम रु. २०,०००/- रोखीने भरावी लागेल. अंतिम बोली बोलणारा शेतकरी वगळून जमा झालेली राकम लिनावाच्या ठिकाणी शेतकर्यांना रोखीने परत करण्यात येईल.
२. अंतिम बोली बोलणार्यास ताबडतोब रु. ३०,०००/- रोखीने जमा करावी लागेल आणि उर्वरित बोलीची संपूर्ण रक्कम लिलाव दिनांकापासून सात (७) दिवसाच्या आत कृषि विभाग जि.प. अकोला येथे धनाकर्षाद्वारे (डीडी) / आर.टी.जि.एस. द्वारे कृषि विकास अधिकारी जि. प. अकोला यांचे नावे भरावी लागेल. विहित मुदतीत उर्वरित रक्कम न भरल्यास जमा केलेली रक्कम रु. ५०,०००/- जप्त करण्यात येईल.
३. जमीन वाहितीसाठी घेणाऱ्या शेतकऱ्यास रु. ५००/- च्या स्टम्पपेपरवर कृषि विकास अधिकारी, अकोला याचेशी विहित करारनामा लिहून द्यावा लागेल.
४. लिलावामध्ये शेती घेणार्यास विद्या मंदिर फार्म वरील कोणतीही सुविधा जिल्हा परिषद, अकोला कडून मिळणार नाही. उदा. जागा, गोडवून, बैलगाडी, पीकविमा, शेतीविषयक साहित्य इत्यादी.
५. शेतावरील झाडे माती बांध, इत्यादी वर लिलावात जमीन घेणाऱ्या शेतकऱ्याचा हक्क राहणार नाही.
६. लिलावात योग्य रक्कम प्राप्त न झाल्यास लिलाव रद्द करण्याचा अधिकार लिलाव अधिकारी तथा कृषि विकास अधिकारी जि. प. अकोला यांना राहील.
७. नैसर्गिक आपत्तीमुळे, गैरकायदेशीर अतिक्रमण, न्यायालयीन प्रकरणामुळे अथवा अन्य कोणत्याही कारणास्तव झालेल्या नुकसानीस जिल्हा परिषद जबाबदार राहणार नाही, लिलावात जमीन घेतलेल्या बाबत फक्त प्रमाणपत्र देण्यात येईल.
८. या लिलावाद्वारे बाहितीस प्राप्त झालेल्या शेतीमुळे जमीन महसूल अधिनियम १९६६ तसेच या संदर्भातील इतर कुठल्याही कायद्याचे, नियमाचे, अधिनियमाचे उल्लंघन होणार नाही याची सर्व खबरदारी लिलावधारक शेतकऱ्याने घेणे बंधनकारक राहीन.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद ,अकोला

सिटी न्यूज अकोला

शुक्रवार, दि. १५ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com



## हिवरखेड मध्ये छत्रपती संभाजी महाराज जयंती साजरी



**हिवरखेड :** छत्रपती संभाजी राजे जयंती निमित्त जल्लोषात शोभायात्रा काढण्यात आली असून सर्वत्र छावामय वातावरण निर्माण झाले होते गावातून महाराजांची विशाल मिरणूक काढण्यात आली. ठिकठिकाणी महाराजाना अभिवादन करण्यात आले शोभायात्रेत शेकडोच्यावर शंभूच्या सैनिकांनी सहभाग नोंदविला होता, या शोभायात्रेचे आयोजन धर्मवीर छत्रपती श्री संभाजीराजे जन्म उत्सव समितीने केले होते. हिवरखेड पोलिसांचा चोख बंदोबस्त होता.

## मतदार याद्यांची 'विशेष सखोल पुनरिक्षण' मोहिम

**अकोला:** जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने नुकताच आढावा घेतला. आयोगाच्या निर्देशानुसार प्रशिक्षण, तसेच विहित कार्यक्रमानुसार नियोजनबद्ध कार्यवाही करण्याचे निर्देश जिल्हाधिका-यांनी दिले आहेत. जिल्ह्यातील १६ लाखांहून अधिक मतदारांची प्रत्यक्ष पडताळणी या कार्यक्रमाद्वारे होणार आहे.

# 'छावा' चा छत्रपती संभाजी महाराजांना मानाचा मुजरा

प्रतिनिधी १५ मे

**अकोला :** 'छावा' संघटनेतर्फे स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी राजे यांची जयंती अकोला नगरीत उत्साहात साजरी करण्यात आली. शोभायात्रेतील जिवंत देखाव्यांनी जागवला संभाजी महाराजांचा इतिहास.

प्रारंभी स्थानिक शिवाजी पार्क येथे अश्वारूढ छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे तसेच छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन खासदार अनुप धोत्रे, आमदार रणधीर सावरकर, स्थायी समितीचे सभापती विजय अग्रवाल, जयंत मसने, छावाचे जिल्हाप्रमुख शंकरराव वाकोडे, उपमहापौर अमोल गोगे, दत्ता महाराज दोनव्हे, माजी आमदार राजन साळवी, डॉ. दीपक मोरे, नगरसेवक पवन महल्ले, छावाचे प्रसिद्धी प्रमुख प्रदीप खाडे, डॉ. संजय सरोदे, रितेश मिर्झापुरे, हरीश अलीमचंदानी, डॉ. रणजीत कोरडे यांच्या हस्ते करण्यात आले.

सायंकाळी शिवाजी पार्क येथून निघालेल्या शोभायात्रेत हजारो युवक, विविध आखाड्यांचे चित्त थरारक प्रात्यक्षिके, नृत्य, लेझीम, टाळकरी, वारकरी, भजनी मंडळे, विविध विलोभनीय दृश्य यांचा मोठ्या प्रमाणात सहभाग होता, छावाच्या प्रचंड मिरवणुकीने अकोला नगरी संभाजीमय होऊन गेली होती, संभाजी महाराजांच्या जयघोषाने मिरवणुकीत सहभागी झालेल्या युवकांमध्ये एक वेगळाच उत्साह निर्माण झाला होता. धोंडा आखर येथील राजेश दहीकर यांनी बसविलेले आदिवासी महिलांचे नृत्य, मोठी उमरी येथील आई रेणुका भजनी मंडळ, पुंडा येथील जय मल्हार भजनी मंडळ, खापरवाडी येथील आनंदा सुपळकर यांनी साकारलेला गोंधळी, मोठे बारगन येथील पेशवाई ग्रुपचा ढोल बँजो,

### ♦ जिवंत देखाव्यांनी जागवला संभाजी राजांचा इतिहास




विजय तावडे यांचा सनई तुतारी चौघडा, पाटसुल येथील सुजित धोंडेकर यांनी साकारलेले गाडगेबाबा, पिंपरी जयनपूर येथील संतोष भगत यांनी साकारलेले संभाजी महाराज, अरविंद बानेरकर यांचा तंट्या भिल्ल, पिंपरी येथील राजेश दाभाडे यांचा तरंगता साधू, रुपेश मोहन यांनी साकारलेले चंद्रशेखर आझाद यांचे पात्र, गुदगुल्या करणारे महाकाय अस्वले, मोठ्या आकारातील बजरंग बली व त्यांच्यासोबत वावरणारी अनेक माकडे, ८५ किलोचा त्रिशूळ खांद्यावर घेऊन केलेले नृत्य, विविध आखाड्यांचे चित्त थरारक प्रात्यक्षिके, मलखांब, लाठी काठी, अंकिता वाकोडे यांनी साकारलेली जिजाऊ मासाहेब, छत्रपती संभाजी नगर येथील ह. भ. प. रघुनाथ महाराज यांचे एकनाथ महाराजांवरील भारुड, पिंपरी डिक्कर येथील श्री गुरुदेव भजन सेवा मंडळाची भजने आदी या मिरवणुकीचे विशेष आकर्षण होते. शिवाजी पार्क येथून निघालेली शोभायात्रा टिळक रोड, सिटी कोतवाली चौक, गांधी चौक, खुले नाट्यगृह चौक व स्वराज्य भवनला समारोप करण्यात आला. विविध ठिकाणी सामाजिक संघटनांतर्फे स्वागत करण्यात येऊन छत्रपती संभाजी राजांना मानवंदना दिली. थंड पाणी व सरबताची व्यवस्था केली होती. एकंदरीत सर्वधर्मसमभावाच्या स्वरूपात ही जयंती उत्साहात व अतिशय शांततेने कोणताही अनुचित प्रकार न घडता संपन्न झाली. सुमारे ३ तास चाललेल्या या मिरवणुकीत हजारो युवकांसह लहान मुले मुली, ज्येष्ठ नागरिक व महिला सुद्धा बहुसंख्येने सहभागी झाल्या होत्या. जयंती सोहळा यशस्वी करण्यासाठी छावाचे जिल्हाप्रमुख शंकरराव वाकोडे यांच्या नेतृत्वाखाली प्रदीप खाडे, अरविंद कपले, रितेश मिर्झापुरे, मनीराम



टाले, सुरेश खुमकर, गुरुजी, डॉ संजय सरोदे, महेंद्र काळे, श्याम कुलट, रजनीश ठाकरे, धनराज लाहोळे, डॉ. संतोष भिसे, निवृत्ती वानखडे, शाम कोल्हे, संतोष ढोरे,, योगेश गोतमारे, अनिरुद्ध भाजीपाले, महेंद्र काळे, बबलू वसु यांचे सह इतरही पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. या मिरवणुकीत डॉ. सुजय पाटील, प्रा. नितीन बाठे, डॉ. दीपक केळकर, आशिष पवित्रकार, अशोक पटोकार, दिवाकर पाटील, राजाभाऊ पात्रीकर, माधव मानकर, लक्ष्मीकांत कौठकर, पुरुषोत्तम आवारे यांच्या सह शिवभक्त मोठ्या संख्येने सहभागी होते.

### घरोघरी झाले संभाजी महाराजांचे पूजन

- संभाजीराजांच्या जयंतीनिमित्त आज ग्रामीण भागातील अनेक ठिकाणी महाराजांच्या प्रतिमेचे व पुतळ्याचे पूजन करण्यात आले. अकोला शहरातही अनेक घरांमध्ये संभाजीराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

## तुलंगा बु. येथील दिलीप मुंडे यांच्या कुटुंबियांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचेकडून 1 लाखाची मदत

प्रतिनिधी १५ मे

**पातूर :** तालुक्यातील तुलंगा बु. येथे मन नदीत बुडून शिवसैनिक दिलीप मुंडे यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली. दिलीप मुंडे हे निष्ठावान शिवसैनिक होते. ८ मे २०२६ रोजी स्थानिक शिवसेना पदाधिकाऱ्यांनी ही माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिली. माहिती मिळताच शिंदे यांनी कोणताही विलंब न करता मुंडे कुटुंबीयांना तात्काळ रोख १ लाख रुपयांची आर्थिक मदत दिली. यावेळी शिवसेना अकोला जिल्हा संपर्क प्रमुख राजन साळवी,



जिल्हाप्रमुख नारायण गव्हाणकर, जिल्हाप्रमुख चंद्रशेखर पांडे गुरुजी, शिवसेना जिल्हा समन्वयक प्रणव तायडे तसेच गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. याशिवाय दिलीप मुंडे यांच्या मुलांच्या पुढील शिक्षणासाठीही मदत करण्यात येणार असल्याची माहिती शिवसेना पदाधिकाऱ्यांनी दिली. या मदतीमुळे मुंडे कुटुंबीयांना मोठा आधार मिळाला असून परिसरातून त्यांचे आभार व्यक्त करण्यात येत आहेत.

## डाबकी रोडवर रंगला 'लुक्स मेकर फॅमिली सलून'चा दिमाखदार सोहळा

प्रतिनिधी १५ मे

**अकोला :** डाबकी रोड परिसरातील नागरिकांना उत्तम दर्जाच्या हेअर आणि ब्युटी सर्व्हिसेससाठी लांब जाण्याची गरज नाही. आपल्या संपूर्ण कुटुंबासह तुम्ही या हाय-टेक आणि स्टायलिश सलूनचा लाभ घेऊ शकता.एकाच छताखाली फॅमिलीसाठी सर्व सोयी उपलब्ध करून देत 'लुक्स मेकर'ने अकोलेकरांची मनं जिंकली आहेत. तर मग वाट कसली बघताय? आजच भेट द्या आणि आपल्या लूकला द्या एक नवा टच ! 'लुक्स मेकर फॅमिली सलून' चे भव्य उद्घाटन अत्यंत उत्साहात पार पडले. या शानदार सोहळ्याचे उद्घाटन सौ. सावित्री रूप सिंग ठाकूर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. याप्रसंगी त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि उपस्थित पाहुण्यांचा उत्साह सोहळ्याची शोभा वाढवत होता. या उद्घाटन समारंभाला ठाकूर आणि श्रीवास परिवारातील सदस्यांसह शहरातील अनेक प्रतिष्ठित व्यक्तींनी हजेरी लावली होती. यामध्ये प्रामुख्याने सचिन सिंग ठाकूर, शुभम सिंग ठाकूर, शशिकांत ठाकूर, किशोर श्रीवास, प्रमोद श्रीवास, सुदर्शन श्रीवास, विक्की सिंग ठाकूर आणि सूर्यकांत कलाशकर, यांच्यासह अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून या नवीन उपक्रमाला भरभरून शुभेच्छा दिल्या. 'लुक्स मेकर फॅमिली सलून' हे डाबकी रोडवरील निशांत बँकेच्या मागे असलेल्या श्रीराम टॉवर येथे आहे.डाबकी रोडवरील रहिवाशांसाठी एक आनंदाची बातमी समोर आली असून, 'लुक्स मेकर फॅमिली सलून' चे भव्य उद्घाटन अत्यंत उत्साहात पार पडले. ज्यांना आपल्या लुक मध्ये बदल करायचा आहे त्यांच्यासाठी हे फॅमिली सलून उपयोगी ठरणार आहे.




### तुम्हाला कॉन्फीडन्ट व्हायचे असेल तर या लुक्स मेकर फॅमिली सलूनमध्ये

## निधन वार्ता

### माधुरीताई जडिये



**बाळापूर :** येथील महादेव मंदिर संस्थानचे अध्यक्ष चंपकलाल रतिलाल जडिये उर्फ बबलू भाऊ यांच्या धर्मपत्नी सौ. माधुरीताई जडिये यांना १३ मे रोजी रात्री हृदयविकाराचा तीव्र झटका आला. व त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पश्चात दोन मुले, मुली व बराच मोठा आप्त परिवार आहे.

गुरुवारी येथील बारादारी मधील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांना श्रद्धांजली देण्यासाठी बराच मोठा जनसमुदाय उपस्थित होता. बाळापूर नगर परिषदेचे उपाध्यक्ष सुरेंद्र धोपटे, पत्रकार संघाचे नेते रमेशभाऊ ठाकरे, रमेशभाऊ लोहकरे, संस्थानच्या वतीने अरुण भागवत, माजी नप सदस्य रितेश गुजराती, कैलास धनोकार, जयराम सोनवणे, शिवभक्त परिवाराच्या वतीने रवी वखरे यांनी श्रद्धांजली अर्पण केली.

## माना परिसरात दोन जुगार अड्ड्यांवर छापे, 5 जणांना अटक

प्रतिनिधी १५ मे

**मुर्तिजापूर :** 'ऑपरेशन प्रहार मोहिमेतंर्गत १४ मे रोजी माना पोलीस ठाण्याच्या हद्दीत दोन वेगवेगळ्या ठिकाणी जुगार अड्ड्यांवर धाडी टाकण्यात आल्या. या कारवाईत पोलिसांनी एकूण ५ आरोपींना अटक केली असून, त्यांच्याकडून रोख रक्कम आणि जुगाराचे साहित्य जप्त केले आहे.

गावातील गनी प्लॉटजवळ सुरू असलेल्या सट्टा अड्ड्यावर पोलिसांनी पहिली धाड टाकली. या कारवाईत खालील आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे: सय्यद ऐजाज सय्यद न्याहमत अली वय ४८ वर्षे, रा. माना प्रगोद आनंदराव सोळंके रा. माना व रविंद्र रामचंद्र सरदार हिवरा कोरडे त्यांच्याकडून सट्ट्याच्या चिठ्ठ्या, डॉट पेन, कार्बन पेपर आणि १,९२० रुपये रोख जप्त करण्यात आले. दुसरी धाड गावातील 'जुना प्लॉट' भागात टाकण्यात आली. येथे पोलिसांनी सट्टा खेळणाऱ्या दोन व्यक्तींना रंगेहाथ पकडले. अशोक पांडुरंग विल्हेकर रा. येवदा, संतोष रमेश




खडे, रा. रामतीर्थ यांच्या ताब्यातून सट्टा साहित्य आणि १,१३० रुपये रोख जप्त करण्यात आले. त्यांच्यावर गुन्हा क्रमांक २०९/२०२६, कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये कारवाई करण्यात आली आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक अर्चित चांडक, अप्पर पोलीस अधीक्षक बी.के. रेड्डी आणि मुर्तीजापूरच्या उपविभागीय पोलीस अधिकारी वैशाली मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या पथकात माना पोलीस ठाण्याचे ठाणेदार गणेश नावकार, पोलीस हवालदार मनोहर इंगळे, उमेश हरमकार आणि पोलीस कॉन्स्टेबल सुशील आठवले यांचा समावेश होता.

## ग्रामपंचायत मध्ये संभाजी महाराज जयंती साजरी




प्रतिनिधी १५ मे

**अडगाव :** ग्रामपंचायत मध्ये संभाजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी सर्व प्रथम संभाजी महाराज यांच्या प्रतीमेचे पुजण करुण हारार्पण करण्यात आले.यावेळी कार्यक्रमाला उपस्थित ग्रामपंचायत प्रशासक खंडारे मॅडम ,ग्राम शेवक खुमकर साहेब ,संजय राजनकर ,ग्रा.प.लिपीक राजुभाऊ कौटकार, शेख जमीरभाई, माजी जि.प.सदस्य डॉ.मनमोहणजी व्यास बबलु मानकर, मुन्नाभाऊ ठाकुर, अक्षय बहाकर, अनिल मानकर ,राहुल देशमुख, दिलीप डवले, अभिजित ढगे, छोटु आप्पा, गुलाबसिंग डाबेराव, राजेद्र तायडे इत्यादी मान्यवरांच्या हस्ते संभाजी महाराजांची जयंती साजरी करण्यात आली.

## अल्पवयीन मुलीवरील विनयभंग प्रकरणातील आरोपीस 6 महिन्यांची शिक्षा

प्रतिनिधी १५ मे

**पातूर :** अल्पवयीन मुलीवरील विनयभंग व पोक्सो प्रकरणातील आरोपीस न्यायालयाने ६ महिन्यांच्या कारावासाची शिक्षा तसेच दंड ठोठावला आहे. ही शिक्षा आज दि. १४ मे २०२६ रोजी जिल्हा व सत्र न्यायाधीश-१, अकोला यांनी सुनावली.

या प्रकरणातील आरोपी नितीन सुखदेव ताजणे (वय ३४, रा. चोंडी, ता. पातूर) यास पोक्सो कायद्याच्या कलम १२ अंतर्गत ६ महिने सक्त कारावास व १००० रुपये दंड, दंड न भरल्यास १ महिना साधा कारावास अशी शिक्षा सुनावण्यात आली. तसेच भादंवि कलम २९४ अंतर्गत १ महिना साधा कारावास व ५०० रुपये दंड, दंड न भरल्यास १५ दिवस साधा कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली.

फिर्यादीनुसार, दि. २७ जानेवारी २०१८ रोजी सकाळी ११ वाजताच्या सुमारास पीडित मुलगी तिच्या मैत्रिणीसोबत कॉलेजमधून परत येत असताना आरोपीने मोटारसायकलवरून येत अश्लील शिवीगाळ केली. तसेच 'तू दुसऱ्या मुलासोबत बोलली तर तुला मारून टाकीन' अशी धमकी देत तिचा मोबाईल हिसकावून घेत मारहाण केली होती. याप्रकरणी चान्नी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाचा तपास तत्कालीन सपोनि गजानन पोटे व पोउनि जयसिंग पाटील यांनी केला. तपास पूर्ण करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. सरकार पक्षातर्फे एकूण ८ साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. सरकारी पक्षाची बाजू अकोला येथील सरकारी अभियोक्ता यांनी मांडली. तसेच चान्नी येथील पैरवी अधिकारी पोहेका अशोक पाटोळे व सीएमएस येथील सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक फजलूर रहमान काझी यांनी न्यायालयीन कामकाजात सहकार्य केले.

## स्व. रामकृष्ण आढे स्मृती विदर्भभूषण पुरस्कार मंजितसिंह शीख यांना जाहीर

प्रतिनिधी १५ मे

**अकोला :** ज्येष्ठ सर्वोदयी, स्वतंत्रता सेनानी स्व. रामकृष्ण आढे स्मारक समिती केळीवेळी चे वतीने दरवर्षी गोरक्षण, भूदान, ग्रामदान, शैक्षणिक, सामाजिक क्रीडा, महिला, युवक, आदिवासी क्षेत्रात समर्पित भावनेने कार्य करणाऱ्या कार्यकर्त्याला विदर्भभूषण पुरस्कार देऊन गौरविले जाते. २०२६ चा स्व. रामकृष्ण आढे स्मृती विदर्भ भूषण पुरस्कार सातपुडा कुशीतील सालईबन ता. जळगाव जामोद येथील पर्यावरण मित्र तरुणाई फाउंडेशनचे कार्यकर्ते मंजीतसिंह शिख यांना जाहीर झाला आहे. स्व. रामकृष्ण आढे स्मारक समिती केळीवेळी चे




### ♦ १७ ला पुरस्कार वितरण

वतीने रविवार दि. १७ मे २०२६ ला सकाळी ८.३० वाजता मारुती संस्थान केळीवेळी येथे ज्येष्ठ गांधीवादी महेंद्रबाबू गोयनका दहीहांडा यांचे अध्यक्षतेखाली व साम्ययोगचे संपादक, महाराष्ट्र प्रदेश सर्वोदय मंडळाचे अध्यक्ष रमेशअण्णा दाने, विदर्भ भूदान मंडळाचे सचिव एकनाथ डगवार, ग्राम मंडळ केळीवेळी चे अध्यक्ष किशोर बुले यांचे प्रमुख उपस्थितीत प्रदान करण्यात येत आहे. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन स्व. रामकृष्ण आढे स्मारक समिती केळीवेळीचे अध्यक्ष डॉ. महेंद्रसिंग ठाकूर, सचिव सुनील अवचार व संयोजक महेश आढे यांनी केले आहे.

## 'आधुनिक दधीची' ग्रंथाचे आज प्रकाशन

प्रतिनिधी १५ मे

**अकोला :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यासाठी संपूर्ण आयुष्य समर्पित करून 'राष्ट्राय स्वाहा इदं न मम' हा जीवनमंत्र प्रत्यक्ष आचरणातून साकार करणारे ज्येष्ठ संघ प्रचारक स्व. वसंतरावजी कसबेकर यांच्या जीवनावर आधारित 'आधुनिक दधीची' या प्रेरणादायी ग्रंथाच्या प्रकाशन सोहळ्याचे आयोजन अकोला येथे करण्यात आले आहे. राष्ट्रनिष्ठा, त्याग, समर्पण आणि प्रसिद्धीपराङ्मुख जीवनमूल्यांचा प्रेरक प्रवास या ग्रंथातून समाजासमोर उलगडणार आहे. समर्पित आणि त्यागमय जीवनाची प्रेरक गाथा 'आधुनिक दधीची' या ग्रंथातून साकारण्यात आली आहे. या प्रकाशन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विदर्भ प्रांत कार्यवाह अतुल मोघे हे राहणार असून, प्रमुख वक्ते म्हणून अखिल भारतीय सह प्रचार प्रमुख प्रदीप जोशी मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमास अकोल्याचे पालकमंत्री आकाश फुंडकर, अकोला विभाग संघचालक नरेंद्र देशपांडे, रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, मुंबई यांच्या कुलगुरू डॉ.अपूर्वा पालकर तसेच बेरार एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अ‍ॅड. मोतीसिंह मोहता यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.हा प्रकाशन सोहळा शुक्रवार, दि. १५ मे २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता श्री. रा. ल. तो. महाविद्यालय सभागृह, अकोला येथे संपन्न होणार आहे. स्व. वसंतराव कसबेकर स्मृती संकलन समिती, अकोला यांच्या वतीने नागरिकांनी सहकुटुंब, सहपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित राहून या प्रेरणादायी सोहळ्याचा लाभ घ्यावा.





सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ

शुक्रवार, दि. १५ मे २०२६ https://epaper.citynewssuperfast.com

# राजापूर टाकळी घरफोडीचा पर्दाफाश; हैदराबादमधून आरोपी जेरबंद

प्रतिनिधी १५ मे

**उमरखेड :** तालुक्यातील राजापूर (टाकळी) येथे घडलेल्या घरफोडीच्या गुन्ह्याचा छडा लावत उमरखेड पोलिसांच्या डिटेक्शन ब्रँचने (डीबी) मोठी कारवाई केली आहे. हैदराबाद (तेलंगणा) येथे लपून बसलेल्या दोन आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले असून, त्यांच्याकडून सोने-चांदीचे दागिने, रोकड आणि दुचाकीसह एकूण ७ लाख ३६ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

मनोहर देवराव चव्हाण (वय ४६, रा. राजापूर टाकळी, ता. उमरखेड) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहे. तसेच एका विधीसंघर्षग्रस्त बालकालाही ताब्यात घेण्यात आले आहे.



राजापूर (टाकळी) येथील वनीता गजानन मोहिते या १८ ऑक्टोबर २०२६ रोजी बाहेरगावी गेल्या असताना अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या घराच्या खिडकीचे गज काढून घरात प्रवेश केला. त्यानंतर कपाटाचे कुलूप तोडून रोख रक्कम तसेच सोन्या-चांदीचे दागिने लंपास करण्यात आले होते. या प्रकरणी उमरखेड पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत कलम ३३१(३), ३३१(४), ३०५ आणि ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन उपविभागीय पोलीस अधिकारी हनुमान गायकराव आणि पोलीस निरीक्षक शंकर पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली डीबी पथकाचे प्रभारी पोलीस उपनिरीक्षक सागर इंगळे यांनी तपास सुरू केला. परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी आणि गोपनीय माहितीच्या आधारे संशयित आरोपी हैदराबाद येथे असल्याचे निष्पन्न झाले.

यानंतर पोलिसांच्या पथकाने हैदराबाद येथे जाऊन संशयितांना ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली. या प्रकरणात मनोहर देवराव चव्हाण (वय ४६, रा. राजापूर टाकळी, ता. उमरखेड) याला अटक करण्यात आली असून एका विधीसंघर्षग्रस्त बालकालाही ताब्यात घेण्यात आले आहे. तसेच सविता ऊर्फ संगिता लक्ष्मण मोहिते (रा. वडोली, ता. किनवट) हिने आरोपींना सहकार्य केल्याचे तपासात समोर आले आहे.

आरोपींकडून सोन्याच्या अंगठ्या, चैन, लॉकेट, गंठण, कर्णफुले, चांदीचे पैंजण, रोख रक्कम तसेच गुन्ह्यात वापरण्यात आलेली होंडा स्प्लेंडर मोटारसायकल (एमएच-२९-बीए-८९१५) जप्त करण्यात आली आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंथा, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी हनुमान गायकराव, पोलीस निरीक्षक शंकर पांचाळ आणि पोलीस निरीक्षक यशोधरा मुनेश्वर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. तपास पथकात पोउपनि सागर इंगळे यांच्यासह संघशिल टेंभरे, दिगंबर गीते, आकाश पवार आणि सचिन देवकर यांचा समावेश होता. आरोपींना न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली असून पुढील तपास सुरू आहे.

# ऊस उत्पादक एफआरपीच्या प्रतीक्षेत; भैरवनाथ शुगरविरोधात डफडे आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी १५ मे

**उमरखेड :** भैरवनाथ शुगर लिमिटेड, पोफाळी कारखान्याकडे गाळपासाठी दिलेल्या ऊसाची एफआरपी रक्कम अद्याप न मिळाल्याने ऊस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. कारखाना प्रशासनाने ३० एप्रिलपर्यंत रक्कम देण्याचे लेखी आश्वासन दिले होते. मात्र, त्या आश्वासनाची पूर्तता न झाल्याने शिवसेना जिल्हा सहसंपर्कप्रमुख चितांगराव कदम यांनी १६ मे रोजी कारखान्याच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर डफडे आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

याबाबत भैरवनाथ शुगरचे जनरल मॅनेजर यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, वसंत सहकारी साखर कारखाना, पोफाळी तथा भैरवनाथ शुगर मिल लिमिटेडकडे हंगाम २०२५-२६ मध्ये गाळपास गेलेल्या ऊसाची सुमारे ३५ कोटी रुपयांची एफआरपी रक्कम ३० एप्रिलपर्यंत अदा करण्यात येईल, असे लेखी आश्वासन ३ एप्रिल रोजी देण्यात आले होते. हे आश्वासन जिल्ह्याचे पालकमंत्री तसेच आंदोलनकर्ते शेतकरी नेते चितांगराव कदम यांना उपविभागीय अधिकाऱ्यांच्या दालनात देण्यात आले होते. मात्र, मुदत उलटूनही शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम जमा करण्यात आलेली नाही. त्यामुळे उमरखेड आणि हदगाव तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. विशेषतः लग्नसराईच्या काळात पैसे न मिळाल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी वाढली आहे. कारखाना प्रशासनाच्या भूमिकेविरोधात संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी शिवसेना जिल्हा सहसंपर्कप्रमुख चितांगराव कदम यांच्या नेतृत्वाखाली १६ मे रोजी पोफाळी येथे कारखान्याच्या मुख्य गेटसमोर डफडे आंदोलन आणि निषेध मोर्चा काढण्याचा निर्णय घेतला आहे.

यासंदर्भातील निवेदन साखर आयुक्त, पुणे, सहसंचालक साखर अमरावती, जिल्हाधिकारी यवतमाळ तसेच कारखान्याचे जनरल मॅनेजर यांना पाठविण्यात आले असल्याचे कदम यांनी सांगितले.

## राधाकृष्ण मूर्तीची प्राणप्रतिष्ठा

प्रतिनिधी १५ मे

**यवतमाळ :** लोहारा चौकाजवळील आयएमए हॉलसमोरील पटांगणात राधाकृष्ण मंदिराचे बांधकाम पूर्ण झाले आहे. या मंदिरात संगमरवर या पाषाणापासून राधा-कृष्णाची मूर्ती स्थापित करण्यात आली. ही मूर्ती गुजरातमधील सुरत येथील कारागिरांनी पूर्णत्वास नेली आहे.

मागील तीन दिवसांपासून मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठेसाठी विविध प्रकारच्या विधिवत पूजेद्वारे व नगर भ्रमण करून मंदिरामध्ये मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली आहे. यावेळी यादव समाजासह सर्व समाजबांधव उपस्थित होते.

# विदर्भातील मानाच्या पालख्यांची संख्या वाढविण्याची मागणी

प्रतिनिधी १५ मे

**यवतमाळ :** पंढरपूर येथील आषाढी एकादशी यात्रेसाठी मानाच्या दहा पालख्यांसोबत सहभागी होणाऱ्या नोंदणीकृत दिंड्यांना प्रत्येकी २० हजार रुपयांचे अनुदान देण्यास राज्य शासनाने १६ जुलै २०२५ रोजीच्या शासन परिपत्रकाद्वारे मान्यता दिली आहे.

मात्र, शासनाने जाहीर केलेल्या मानाच्या दहा पालख्यांच्या यादीत विदर्भातील अकरा जिल्ह्यांमधून केवळ अमरावती जिल्ह्यातील श्रीक्षेत्र कौंडण्यपूर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी संस्थानच्या पालखीचाच समावेश करण्यात आला आहे.

यामुळे विदर्भातील हजारो वारकरी आणि दिंडीप्रमुखांना अनुदानाचा लाभ मिळविण्यासाठी कौंडण्यपूरच्या पालखीसमवेतच पंढरपूरकडे प्रस्थान करावे लागणार आहे. परिणामी, मोठ्या प्रमाणावर दिंड्यांची एकाच पालखीमध्ये गर्दी होऊन नियोजन बिघडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

अनुदानाची रक्कम थेट नोंदणीकृत दिंडींच्या खात्यात जमा होणार असल्याने विदर्भातील विविध जिल्ह्यांतून मोठ्या संख्येने दिंड्या सहभागी होतील. या दिंड्यांचे योग्य नियोजन न झाल्यास वारकऱ्यांना गैरसोयीचा सामना करावा लागू शकतो, अशी भीती व्यक्त होत आहे.

या पार्श्वभूमीवर विदर्भातील मानाच्या पालख्यांची संख्या तातडीने वाढवावी, अशी मागणी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज कलावंत वारकरी सेवा विकास व सन्मान संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ॲड. श्याम खंडारे यांनी शासनाकडे केली आहे.

दरम्यान, या प्रश्नाबाबत जिल्ह्याचे पालकमंत्री ना. संजय राठोड, राज्यमंत्री ना. इंद्रनील नाईक तसेच वणीचे आमदार संजय देरकर यांनीही समाज कल्याण मंत्रालयाला लेखी पत्र पाठवून वाशीम जिल्ह्यातील पोहरादेवी, धामणगाव देव आणि वणी येथील जगन्नाथ बाबा या तीर्थक्षेत्रांचा मानाच्या पालख्यांमध्ये समावेश करण्याची मागणी केली आहे.

विदर्भातील समस्त वारकरी बांधवांकडून शासनाने या मागणीची तातडीने दखल घेऊन योग्य निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# ओम राऊत तालुक्यातून द्वितीय

प्रतिनिधी १५ मे

**नेर :** येथील वऱ्हाड साहित्य मंचाचे सक्रीय सदस्य कवी अजय राऊत यांचा मुलगा ओम अजय राऊत याने इयत्ता दहावीच्या परीक्षेत ९४.८० टक्के गुण मिळवून तालुक्यातून द्वितीय क्रमांक पटकावला आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे नुकताच दहावीचा निकाल जाहीर करण्यात आला.

ओम हा नेर येथील इलिगंट इंग्लिश मीडियम स्कूलचा विद्यार्थी असून त्याने इंग्रजी माध्यमातून हे यश संपादन केले आहे. रोजंदारीवर टेलरिंगचे काम करणारे वडील अजय राऊत आणि लेडीज टेलरिंग व्यवसाय सांभाळणाऱ्या आईने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत मुलाला शिक्षण दिले. कोणतीही खासगी शिकवणी न लावता मुलाने मिळविलेल्या या यशामुळे कुटुंबाचा आनंद गगनात मावेनासा झाला आहे.

आपल्या कष्टाचे चीज मुलाने केल्याची भावना पालकांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसून येत होती. ओमने आपल्या यशाचे श्रेय शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, आई-वडील तसेच नातेवाईकांना दिले आहे.

या यशाबद्दल वऱ्हाड साहित्य मंचाचे संस्थापक सचिव लेखक प्रफुल आकोलकर, किशोर वंजारी, ॲड. रमेश जुनघरे, उद्योजक गजानन नागपूरे, प्रविण चांदोरे, ज्ञानेश्वर सोनटक्के, मयूर काळे, विपूल खिवसरा, संदीप ठक, संदेश बांबोर्डे, संतोष ढेंगे तसेच वऱ्हाड सखी शोभा कोठारी, श्रद्धा सोईतकर, कुमुदिनी हिंगासपूरे, विशाखा वाघमारे आदींनी ओमचे कौतुक केले.

## सोयाबीन पोहोचले ७,६४५ रुपयांवर

प्रतिनिधी १५ मे

**यवतमाळ :** खुल्या बाजारात सोयाबीनचे दर दररोज वाढत आहेत. या वाढलेल्या दराने रोज नवा विक्रम नोंदविणे सुरू केले आहे. गुरुवारी यवतमाळच्या बाजारात बिजवाईच्या सोयाबीनला सात हजार ३०५ ते सात हजार ६४५ रुपये क्विंटलचे दर मिळाले. तर इतर सोयाबीनला सहा हजार ७०० ते सात हजार ३०० रुपये क्विंटलचे दर मिळत आहेत. ऑक्टोबर महिन्याच्या तुलनेत सोयाबीनच्या दरामध्ये क्विंटलमागे साडेतीन हजार रुपयांची दरवाढ झाली आहे. जागतिक स्तरावर निर्माण झालेल्या युद्धाच्या परिस्थितीमुळे खुल्या बाजारात सोयाबीनचे दर रोज वाढत आहे. मात्र, शेतकऱ्यांकडे सोयाबीन शिल्लकच नाही.

# तेजस्विनी पतसंस्थेत १० कोटींचा घोटाळा; संचालक फरार, ठेवीदार आक्रमक

## २० मेपर्यंत न्याय न मिळाल्यास साखळी उपोषणाचा इशारा

प्रतिनिधी १५ मे

**यवतमाळ :** शहरातील तेजस्विनी को-ऑपरेटिव्ह वुमन सोसायटी पतसंस्थेत सुमारे १० कोटी रुपयांच्या आर्थिक गैरव्यवहाराचा धक्कादायक प्रकार समोर आला असून गुंतवणूकदारांचे पैसे अडकले आहेत. ठेवीदारांना जादा परताव्याचे आमिष दाखवून मोठ्या प्रमाणात ठेवी गोळा करण्यात आल्याचा आरोप होत असून संस्थेचे संचालक मंडळ फरार झाल्याने एकच खळबळ उडाली आहे.

या प्रकरणात संस्थेचे संस्थापक प्रमोद सुधाकर शिंदे यांच्यासह संचालक मंडळातील श्रद्धा प्रमोद शिंदे, जयश्री अनिल बिजवे, नेहा अतुल साबळे, कंचन संजयराव शिंदे, आंचल आकाश तेलंग, गंगा संतोष वानखडे, दुर्गा निलेश तेलंग, वनिता प्रेमसिंग पवार, पूनम नेत्रदिप दुधे, प्रिती संदीप टाके, पल्लवी जीवन शिंदे, हेमा पंकजराव गाडबैले आणि लीना निलकंठ मारसकोल्हे यांच्यावर गंभीर आरोप करण्यात आले आहेत. पतसंस्थेकडून ठेवीदारांना तब्बल २४ टक्के परताव्याचे आमिष दाखविण्यात आले होते. अल्पावधीत मोठा नफा मिळेल या अपेक्षेने अनेकांनी आयुष्यभराची बचत संस्थेत गुंतवली. मात्र मुदत पूर्ण झाल्यानंतर ठेवी परत मिळाल्या नाहीत. त्यानंतर संस्थेचे कार्यालय बंद करण्यात आले आणि संचालक मंडळ बेपत्ता झाल्याचा आरोप ठेवीदारांनी केला आहे.

दरम्यान, जिल्हा उपनिबंधक कार्यालयाच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. ६ एप्रिल २०२६ रोजी जिल्हा उपनिबंधकांनी ओंकार पहुरकर यांची प्रशासक म्हणून नियुक्ती केली होती. त्यानंतर १६ एप्रिल रोजी कार्यालयाचा पंचनामा करण्यात आला. यावेळी सहाय्यक निबंधक निनावे, लेखापरीक्षक गुघाणे तसेच इतर कर्मचारी उपस्थित होते.

तपासणी दरम्यान, जळगाव येथील सॉफ्टवेअर कंपनीकडून संस्थेचे सॉफ्टवेअर थकबाकीमुळे बंद करण्यात आल्याची माहिती समोर आली. सुमारे १ लाख ३५ हजार रुपयांची थकबाकी न भरल्याने सॉफ्टवेअर सेवा खंडित करण्यात आली होती. तसेच वायफाय कनेक्शनही बंद असल्याने डेटाची सखोल तपासणी होऊ शकली नसल्याचे सांगण्यात आले.

ठेवीदारांच्या शिष्टमंडळाने जिल्हा उपनिबंधक नानासाहेब चव्हाण यांची भेट घेतली असता, २०२३-२४ आणि २०२४-२५ या वर्षांचे ऑडिट पूर्ण झाल्याचे त्यांनी सांगितले. मात्र २०२५-२६ या वर्षातील व्यवहारांची माहिती सॉफ्टवेअर बंद असल्यामुळे तपासता येत नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यामुळे संबंधित अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर ठेवीदारांनी नाराजी व्यक्त केली आहे.

याशिवाय संस्थेचे नियमित ऑडिट न झाल्याचा, निवडणूक न घेता संचालकांची नियुक्ती करण्यात आल्याचा तसेच वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्यात आली नसल्याचा आरोपही पुढे आला आहे. त्यामुळे सहकार विभागाच्या देखरेखीखालीच हा गैरप्रकार सुरू होता का, असा सवाल उपस्थित होत आहे. दरम्यान, प्रमोद शिंदे याच्या भावाने अवधूतवाडी पोलीस ठाण्यात प्रमोद शिंदे बेपत्ता असल्याची तक्रार दाखल केली आहे.

त्यामुळे या प्रकरणाला आणखी वेगळे वळण मिळाले आहे. प्रशासक नियुक्त होऊन जवळपास २५ दिवस उलटूनही कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने ठेवीदार संतप्त झाले आहेत. २० मेपूर्वी न्याय न मिळाल्यास १ जूनपासून साखळी उपोषण व आमरण उपोषण सुरू करण्यात येईल, तसेच लोकप्रतिनिधींच्या सहकार्याने तीव्र जनआंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा ठेवीदार व कर्मचाऱ्यांनी पत्रकार परिषदेत दिला.

पत्रकार परिषदेला प्रभाकर सोनटक्के, अमोल वगारे, रवी मिश्रा, संध्या सोनटक्के, जगदीश अटल, प्रियांका लंगोटे, सर्वेश नवाडे आदी उपस्थित होते.

# यवतमाळ जिल्ह्यात १४ हजार ८९५ घरांवर सौर ऊर्जा प्रकल्प : वीजबिल शून्यावर

प्रतिनिधी १५ मे

**यवतमाळ :** केंद्र शासनाच्या "प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना" अंतर्गत यवतमाळ जिल्ह्यात सौर ऊर्जेचा वापर झपाट्याने वाढत असून आतापर्यंत १४ हजार ८९५ घरांच्या छतावर सौर ऊर्जा प्रकल्प बसविण्यात आले आहेत. त्यामुळे या ग्राहकांचे वीजबिल शून्यापर्यंत कमी झाले आहे.

या योजनेअंतर्गत महिन्याला सुमारे ३०० युनिट वीज वापरणाऱ्या ग्राहकांना मोफत वीज उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. सौर प्रकल्प बसविण्यासाठी ग्राहकांना केंद्र शासनाकडून प्रतिकिलोवॅट ३० हजार रुपये, अशा प्रकारे २ किलोवॅटसाठी ६० हजार रुपये आणि ३ किलोवॅटसाठी ७८ हजार रुपयांपर्यंत अनुदान थेट बँक खात्यात जमा केले जाते. तसेच बँकांमार्फत सुलभ कर्ज सुविधा देखील उपलब्ध करून देण्यात येत आहे.

महावितरणच्या माध्यमातून या योजनेची प्रभावी अंमलबजावणी सुरू असून ऑनलाइन अर्ज प्रक्रिया, तांत्रिक मार्गदर्शन आणि नेट मीटरिंग सुविधा जलदगतीने उपलब्ध करून दिल्या जात आहेत. मुख्य अभियंता अशोक साळुंके यांच्या मार्गदर्शनात तसेच अधीक्षक अभियंते दिपक देवहाते व प्रविण दरोली यांच्या पुढाकाराने या योजनेला गती मिळत आहे.

जिल्ह्यात सर्वाधिक ६ हजार २५७ सौर प्रकल्प यवतमाळ विभागात उभारण्यात आले आहेत. त्यानंतर पुसद विभागात ३ हजार ४३०, पांढरकवडा विभागात ३ हजार ३६० आणि दारव्हा विभागात १ हजार ८४६ ग्राहकांनी आपल्या घरांवर सौर प्रकल्प बसविले आहेत. या उपक्रमामुळे वीजबिलात मोठी बचत होत असून पर्यावरण संवर्धनालाही चालना मिळत असल्याचे चित्र जिल्ह्यात दिसून येत आहे.

## यूपीआय कोड; २४ हजारांने फसवणूक

प्रतिनिधी १५ मे

**उमरखेड :** मोबाईलमधील यूपीआय कोडचा वापर करून अज्ञाताने २४ हजार ८०० रुपये आपल्या खात्यात वळते केले. या फसवणुकीची तक्रार बुधवारी आशिष शशिकांत शेवाळकर (रा. उमरखेड) यांनी उमरखेड पोलिस ठाण्यात दिली.

मोबाईलमधून यूपीआय कोडचा वापर करून अज्ञाताने २४ हजार ८०० रुपये दुसऱ्या खात्यात वळवल्याचे आशिष शेवाळकर यांच्या लक्षात आले.

ही बाब लक्षात येताच त्यांनी बँकेशी संपर्क साधून वजा झालेल्या रकमेची शहानिशा केली.

# विद्युत चोरीविरोधातील कारवाईदरम्यान महावितरण पथकावर हल्ला; महिलेसह दोघांवर गुन्हा

प्रतिनिधी १५ मे

**उमरखेड :** तालुक्यातील चातारी गावात विद्युत चोरीविरोधात कारवाई करण्यासाठी गेलेल्या महावितरणच्या पथकावर हल्ला झाल्याची घटना बुधवारी सकाळी घडली. या प्रकरणी उमरखेड पोलीस ठाण्यात एका महिलेसह दोघांविरुद्ध शासकीय कामात अडथळा निर्माण करणे, मारहाण करणे आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

साखरा वितरण केंद्राचे सहाय्यक अभियंता पवनगीर अनंतगीर गिरी यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ते महावितरणचे कर्मचारी गजानन राचटकर, धम्मपाल दवणे, अंकुश खराटे, रामकृष्ण कत्तुलवाड आणि अजीम बेग कासीम बेग यांच्यासह चातारी येथे विद्युत चोरी तपासणीसाठी गेले होते.

पथकाने पांडुरंग लक्ष्मण माने, बाबुराव लक्ष्मण माने, शिवाजी चंपत माने आणि सुभाष लक्ष्मण माने यांच्या घरांची तपासणी केली असता मुख्य केबलवरून थेट दुसरी केबल जोडून विद्युत चोरी सुरू असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर संबंधितांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला. तसेच दंड आणि थकबाकी भरल्यानंतरच वीजपुरवठा पुन्हा सुरू करण्यात येईल, असे पथकाने सांगितले.

दरम्यान, सकाळी सुमारे १०.३० वाजता रत्नमाला पांडुरंग माने आणि बंडू चंपत माने हे घटनास्थळी आले. वीजपुरवठा बंद केल्याच्या कारणावरून त्यांनी अधिकाऱ्यांशी वाद घालत धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे.

तक्रारीनुसार, बंडू माने याने "वीजपुरवठा सुरू केला नाही तर जीवे मारून टाकू," अशी धमकी दिली. तर रत्नमाला माने हिने सहाय्यक अभियंता पवनगीर गिरी यांच्या अंगावर धावून जात कॉलर पकडून नखांनी ओरखडे काढले तसेच शर्ट फाडल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या प्रकरणी उमरखेड पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १२१(१), १३२, ३५१(३) आणि ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# आशा स्वयंसेविकेचे आठ महिन्यांपासून मानधन थकीत

प्रतिनिधी १५ मे

**यवतमाळ :** जिल्ह्यातील आशा स्वयंसेविकांचे गेल्या सात ते आठ महिन्यांपासून मानधन थकीत असल्याने त्यांच्यावर आर्थिक संकट ओढवले आहे. मानधन न मिळाल्याने दैनंदिन खर्च भागवणेही कठीण झाल्याची व्यथा स्वयंसेविकांनी व्यक्त केली आहे.

आयटक महाराष्ट्र राज्य आरोग्य खाते आशा व गटप्रवर्तक संघटनेने जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांना निवेदन देऊन थकीत मानधन तातडीने अदा करण्याची मागणी केली आहे. निवेदनानुसार, उमरखेड तालुक्यात जुलै २०२५ पासून मानधन थकीत आहे, तर जिल्ह्यातील इतर १५ तालुक्यांमध्ये ऑक्टोबर २०२५ पासून मानधन मिळालेले नाही.

संघटनेच्या म्हणण्यानुसार, शासनाच्या १२ नोव्हेंबर २०२५ रोजीच्या परिपत्रकात ऑक्टोबर २०२५ पर्यंतचे अनुदान जिल्ह्याला वितरित झाल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. मात्र प्रत्यक्षात आशा स्वयंसेविकांना मानधन मिळाले नसल्याने संभ्रम निर्माण झाला आहे.

गेल्या अनेक महिन्यांपासून उत्पन्नाचा एकमेव स्रोत थांबल्याने आशा स्वयंसेविकांना कुटुंब चालवणे कठीण झाले आहे. या पार्श्वभूमीवर सर्व थकीत मानधन ३१ मे २०२६ पर्यंत अदा करावे, अन्यथा १ जून २०२६ पासून संपावर जाण्याचा इशाराही संघटनेने दिला आहे.

दरम्यान, शासनाने तातडीने हस्तक्षेप करून थकीत मानधन वितरित करावे, अशी मागणी जिल्हाभरातील आशा स्वयंसेविकांकडून केली जात आहे.

# लाडखेड येथे समता सैनिक दलाच्या फलकाचे अनावरण

प्रतिनिधी १५ मे

**लाडखेड :** दारव्हा तालुक्यातील लाडखेड येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त संयुक्त बौद्ध विहाराच्या प्रांगणात समता सैनिक दलाच्या फलकाचे अनावरण करण्यात आले. सेवानिवृत्त आयुक्त पी. बी. आडे आणि सौ. कल्पनाताई परशराम आडे यांच्या हस्ते रिबीन कापून फलकाचे अनावरण करण्यात आले.




यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सामाजिक एकता, बौद्ध धम्माचा प्रचार आणि समता सैनिक दलाच्या कार्याची आवश्यकता यावर भर देण्यात आला.

कार्यक्रमाला समता सैनिक दलाच्या दारव्हा तालुका महिला अध्यक्षा वंदनाताई मेश्राम यांच्यासह ताराबाई सत्यवान भगत, रुपाली मुन, दीक्षा मुन, जयताई भगत, दुर्गाबाई अहिरवार, प्राजक्ता भगत, सोनाली रुपेश मेश्राम, कीर्ती घोडेस्वार, सावित्रीबाई मेश्राम, सुषमा भगत, योगिता खडसे, कांता मेश्राम, कल्पना तायडे, माला दातार, रेखा मेश्राम, आशाताई वानखडे, निलीमा राऊत, यशोदाबाई बन्सोड आदी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## खटेश्वर वीज उपकेंद्राचा कारभार ढेपाळला

प्रतिनिधी १५ मे

**कळंब :** खटेश्वर येथील ३३ केव्ही वीज उपकेंद्राच्या कारभाराने वीज ग्राहक त्रस्त झाले आहेत. वीजपुरवठा वारंवार खंडित होण्यासोबतच दुरुस्तीच्या कामाला लावला जात असलेला विलंब यामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. या केंद्रामध्ये कार्यरत कर्मचारी मुख्यालयी राहत नसल्याने ही समस्या तीव्र होत असल्याचे सांगितले जाते. या केंद्रातून परिसरातील ४२ गावांना वीजपुरवठा केला जातो. गुरुवारी उच्चदाब वीजवाहिनीच्या तारा तुटल्या होत्या. मुख्य लाईनमन आल्याशिवाय तारा जोडता येणार नाही, असे सांगण्यात आले. यवतमाळ येथून अपडाऊन करणारे मुख्य लाईनमन आल्यानंतर कामाला सुरुवात करण्यात आली. दुपारी एक वाजता हे काम आटोपल्यानंतर वीजपुरवठा सुरू झाला. तोपर्यंत नागरिकांना उकाड्यात राहावे लागले. यावर उपाययोजनांची गरज आहे.

### जाहिर सुचना

सर्वसामान्य जनतेला/संबंधित विभागाला कळविण्यात येते की, आमची नावे स्नेहल शंकर पेंदोर व साहिल शंकर पेंदोर, जन्मतारीख २८/०७/२००८, जन्मस्थान निंबादेवी, ता.झरी, जि.यवतमाळ असून आमच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत निंबादेवी येथे उपलब्ध नाही.या संदर्भातील अधिकृत "जन्म नोंद उपलब्ध नसल्याचा दाखला" प्राप्त करण्यासाठी आम्ही तहसील कार्यालय,झरी जामणी येथे अर्ज केलेला आहे.सदर बाबत कोणास काही हरकत अथवा आक्षेप असल्यास त्यांनी मु.निंबादेवी,ता.झरी,जि. यवतमाळ येथे संपर्क साधावा.

सिटी न्यूज अमरावती

शुक्रवार, दि. १५ मे २०२६

http://epaper.citynewssuperfast.com

## विभागीय आयुक्तालयात छत्रपती संभाजी महाराज यांना अभिवादन



**अमरावती:** स्वराज्यरक्षक, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त विभागीय आयुक्त कार्यालयात आज विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

यावेळी अपर आयुक्त संजय जाधव, अजय लहाने, उपायुक्त संतोष कवडे, राजीव फडके, सहाय्यक आयुक्त वैशाली पाथरे, गिता वंजारी यांच्यासह अन्य अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांनीही छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प वाहुन विन्रम अभिवादन केले.

# जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील - केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव

### ◆ विद्यापीठ संचालित बुलढाणा येथील मॉडेल डिग्री कॉलेजच्या नूतन इमारतीचे भूमिपूजन

प्रतिनिधी १५ मे

**अमरावती:** बुलढाणा हा जिल्हा शैक्षणिकदृष्ट्या मागे असला तरी, आता जिल्ह्यात मॉडेल डिग्री कॉलेज, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि कृषी महाविद्यालयासारख्या संस्था उभ्या राहत आहेत. या शैक्षणिक व पायाभूत सुविधांमुळे जिल्ह्याचा कायापालट होणार असून, सर्वांगीण विकासासाठी आम्ही सर्व लोकप्रतिनिधी कटिबध्द आहोत, असे प्रतिपादन केंद्रीय आयुष (स्वतंत्र प्रभार) तथा आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव यांनी केले.




संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ संचालित बिरसिंगपूर येथील मॉडेल डिग्री कॉलेजच्या नूतन इमारतीचे भूमिपूजन ना. प्रतापराव जाधव यांच्या हस्ते पार पडले, त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी आमदार संजय गायकवाड, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, वित्त व लेखा अधिकारी सीए पुष्कर देशपांडे, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य डॉ. व्ही. एच. नागरे, मॉडेल डिग्री कॉलेजचे मानद संचालक डॉ. ए.आर. म्हळसने, कार्यकारी अभियंता जे.एन. काळे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर पाटील तसेच बिरसिंगपूरच्या सरपंच श्रीमती वैशाली शिंदे, प्राचार्य डॉ. निलेश गावंडे, श्री राजेंद्र पांडे, श्री राजपूत आदी उपस्थित होते.

केंद्रीय राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव म्हणाले की, जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींच्या सातत्यपूर्ण प्रयत्नातून आज महाविद्यालयाच्या इमारतीच्या कामाला सुरुवात होत आहे. या महाविद्यालयामुळे जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी उत्तम सोय उपलब्ध होणार आहे. सुसज्ज शैक्षणिक व प्रशासकीय इमारतीसोबतच येथे स्विमिंग पूल, क्रीडांगण यांसारख्या आधुनिक सुविधा निर्माण केल्या जातील. यातून गुणवंत विद्यार्थी घडतील आणि जिल्ह्याचा नावलौकिक वाढेल. मॉडेल डिग्री कॉलेज हे सर्व कॉलेज करता आदर्श राहील. तसेच, सध्याच्या जागतिक युध्दजन्य परिस्थितीचा विचार करता, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या काटकसरीच्या आवाहनाचे सर्वांनी पालन करावे, असेही त्यांनी नमूद केले.

आमदार संजय गायकवाड यांनी आपल्या भाषणात सांगितले की, विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी बाहेरगावी जावे लागत होते. परंतु आता मॉडेल डिग्री कॉलेजमुळे जिल्ह्यातच गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध होणार असल्याचे सांगितले. महाविद्यालयाच्या इमारतीचे बांधकाम उच्च दर्जाचे व्हावे, अशा सूचनाही त्यांनी संबंधित यंत्रणेला दिल्या.

भूमिपूजन सोहळ्याचे अध्यक्षीय भाषण विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले. यावेळी कंत्राटदार श्री प्रतीक राजपूत व आर्किटेक्चर श्री संजय देशमुख यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. विद्यापीठाचे कार्यकारी अभियंता श्री शशिकांत रोडे यांनी मान्यवर अतिथींना मॉडेल डिग्री कॉलेजच्या इमारतीच्या मॉडेलची सविस्तर माहिती दिली.

सुरुवातीला छत्रपती संभाजी महाराज व कर्मयोगी श्री संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी, तर सूत्रसंचालन व आभार जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी केले. कार्यक्रमाला विद्यापीठ अभियंता श्री शशिकांत रोडे, उपकुलसचिव विधी श्री मंगेश जायले, प्राचार्य डॉ. गजानन जाधव, प्राचार्य डॉ. नितीन सांगोले, प्राचार्य डॉ. गायकी, विद्यापीठ प्राधिकारणीचे सदस्य, बुलढाणा शहरातील गणमान्य नागरिक, बिरसिंगपूर येथील रहिवासी तसेच विद्यापीठातील अभियांत्रिकी विभागातील कर्मचारी, मॉडेल डिग्री महाविद्यालयाचे प्राध्यापक तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महानगरपालिकेच्या खुल्या जागेवर बांधलेली जनावरे जप्त

### आयुक्त वर्षा लड्डा यांचे अतिक्रमणधारकांना कडक निर्देश

प्रतिनिधी १५ मे

**अमरावती:** महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा यांनी नागपुरी गेट परिसर, ट्रान्सपोर्ट मार्केट परिसर, अग्निशमन केंद्र तसेच हबीब नगर येथील महानगरपालिकेच्या अधिकृत ओपन स्पेसची पाहणी करून अतिक्रमणाबाबत संबंधित विभागांना कडक निर्देश दिले.

पाहणीदरम्यान हबीब नगर येथील महानगरपालिकेच्या मालकीच्या ओपन स्पेसवर बांधण्यात आलेल्या वॉल कंपाऊंडच्या आत ११ जनावरे व ६ बोकड बांधून ठेवण्यात आल्याचे निदर्शनास आले. संबंधित जनावरे तात्काळ जप्त करून महानगरपालिकेच्या गौरक्षण केंद्रावर जमा करण्यात आली. तसेच सदर जागेवरील अतिक्रमण त्वरित हटविण्याचे आदेश देण्यात आले.



यावेळी आयुक्त वर्षा लड्डा यांनी अतिक्रमणधारकांना स्पष्ट इशारा देत सांगितले की, महानगरपालिकेच्या जागेवरील अतिक्रमणे स्वतःहून त्वरित हटवावीत, अन्यथा महानगरपालिकेमार्फत जप्तीची कारवाई करून पुढील कठोर प्रशासकीय कारवाई करण्यात येईल. पाहणीदरम्यान अग्निशमन केंद्रावरील कर्मचाऱ्यांची उपस्थितीही तपासण्यात आली. कर्मचाऱ्यांनी त्यांना सोपविण्यात आलेली कामे वेळेत व पूर्ण जबाबदारीने पार पाडणे अपेक्षित असल्याचे आयुक्तांनी स्पष्ट केले. कामात कोणत्याही प्रकारचा निष्काळजीपणा सहन केला जाणार नसल्याचेही त्यांनी सांगितले.

स्वच्छता विभागालाही त्यांनी कडक शब्दांत सूचना देत साफसफाईच्या कामात हलगर्जीपणा करू नये, प्रत्येक परिसर स्वच्छ व नीटनेटका ठेवावा, असे निर्देश दिले. रस्त्यावर कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्याचे आदेश देत सर्व स्वास्थ्य निरीक्षकांनी जबाबदारीने काम करावे, असेही त्यांनी नमूद केले.

ङ्गसध्या ज्या पद्धतीने काम सुरू आहे ते समाधानकारक नाही. प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्याने दिलेली जबाबदारी प्रामाणिकपणे व प्रभावीपणे पार पाडावी,ङ्ग अशा शब्दांत आयुक्तांनी नाराजी व्यक्त केली. यावेळी अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, वैद्यकीय स्वच्छता अधिकारी डॉ. अजय जाधव, सहायक आयुक्त मनोज शहाळे, बाजार परवाना सहाय्यक आयुक्त मंगेश कडू, उपअभियंता विवेक देशमुख, उद्यान अधीक्षक अजय विंचुरकर, अतिक्रमण पथक प्रमुख योगेश कोल्हे, जनसंपर्क अधिकारी भूषण पुसदकर, ज्येष्ठ स्वास्थ्य निरीक्षक राजेश राठोड तसेच स्वास्थ्य निरीक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

## मेळघाटातील आरोग्य सेवा अधिक बळकट करण्यासाठी प्रशासन कटिबद्ध

### ◆ जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांची सलोना प्राथमिक आरोग्य केंद्राला आकस्मिक भेट

प्रतिनिधी १५ मे

**अमरावती:** मेळघाटातील आरोग्य सुविधा अधिक बळकट आणि सक्षम करण्यासाठी जिल्हा प्रशासन कटिबद्ध आहे. आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांनी आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडावे, त्यांच्या समस्या प्राधान्याने सोडविल्या जातील, असा विश्वास जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी व्यक्त केला.

नुकतेच जिल्हाधिकारी येरेकर यांनी धारणी तालुक्यातील सलोना येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला आकस्मिक भेट देऊन तेथील आरोग्य सेवांचा आढावा घेतला, त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. विकास आठवले, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. महेंद्र नाडे, वैद्यकीय अधिकारी डॉ. केशव कंकाळ, डॉ. शिरसाठ उपस्थित होते. पाहणी दरम्यान जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी संपूर्ण आरोग्य केंद्राच्या स्वच्छतेची तपासणी केली. त्यांनी औषध भांडारातील साठ्याची आणि औषधांच्या मुदतीची जातीने खात्री करून घेतली. प्रसूती गृहातील सर्व वैद्यकीय उपकरणे सुस्थितीत आणि कार्यान्वित असल्याचे पाहिले. तसेच, वीज पुरवठा खंडित झाल्यास पर्यायी व्यवस्था म्हणून त्यांनी प्रत्यक्ष जनरेटर चालू करून त्याची पडताळणी केली. कनिष्ठ सहाय्यक कार्यालयातील कागदपत्रांचे विविध रंगांच्या फाईल्समध्ये केलेले योग्य वर्गीकरण पाहून त्यांनी कर्मचाऱ्यांच्या शिस्तीचे कौतुक केले. आरोग्य केंद्राच्या कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांची पाहणी करून जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. निवासस्थानांच्या किरकोळ दुरुस्तीसाठी तातडीने अहवाल जिल्हा कार्यालयाला सादर करण्याचे निर्देश देत त्यांनी ही दुरुस्ती लवकरच करून दिली जाईल, असे आश्वासन दिले. त्यांनी १०२ रुग्णवाहिका चालकांना सूचना दिल्या की, रुग्णांना वेळेत रुग्णालयात पोहोचवणे हे प्राथमिक कर्तव्य असून रुग्णांकडून पैशांची कोणतीही मागणी केल्यास कठोर कारवाई केली जाईल. यासोबतच कुपोषित बालकांवर स्थानिक स्तरावर उपचार व्हावेत, यासाठी बालउपचार केंद्रात आवश्यक बेडची व्यवस्था करून हे केंद्र लवकरात लवकर कार्यान्वित करण्याचे आदेश जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी वैद्यकीय अधिकाऱ्यांना दिले.

## छत्रपती संभाजी महाराज यांना अभिवादन



प्रतिनिधी १५ मे

**अमरावती:** छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

यावेळी अतिरिक्त जिल्हाधिकारी गोविंद दानेज, उपजिल्हाधिकारी शिवाजी शिंदे, विधी अधिकारी नरेंद्र बोहरा, नाझर विजय सांगळे उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनीही छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन अभिवादन केले.

## औषध विक्रेत्यांचा २० मे रोजी देशव्यापी बंद; जिल्ह्यात औषध पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी प्रशासन सज्ज, नियंत्रण कक्ष स्थापन

प्रतिनिधी १५ मे

**अमरावती:** अखिल भारतीय औषधी विक्रेता संघटनेच्या वतीने विविध प्रलंबित मागण्यांच्या निषेधार्थ बुधवार, दिनांक २० मे २०२६ रोजी एक दिवसीय देशव्यापी बंदची घोषणा करण्यात आली आहे. या बंदमध्ये देशातील ठोक व किरकोळ औषध विक्रेते सहभागी होणार असून, त्यांनी आपले व्यवहार बंद ठेवण्याचे आवाहन केले आहे. या पार्श्वभूमीवर अमरावती जिल्ह्यात नागरिकांना आवश्यक औषधांचा पुरवठा सुरळीत आणि अखंडपणे उपलब्ध व्हावा, यासाठी अन्न व औषध प्रशासन पूर्णपणे सज्ज झाले असल्याची माहिती अमरावतीचे सहाय्यक आयुक्त (औषधे) डॉ. अ. मा. माणिकराव यांनी दिली आहे.

मुंबई येथील सह आयुक्त (औषधे) तथा नियंत्रण प्राधिकारी यांच्या निर्देशानुसार, अमरावती जिल्ह्यातील सर्व औषध विक्रेते, रुग्णालयांशी संलग्न असलेली औषध दुकाने तसेच २४ तास सुरू असणाऱ्या औषध दुकानांशी प्रशासनाने तातडीने समन्वय साधला आहे. नागरिकांची गैरसोय होऊ नये म्हणून अत्यावश्यक औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध ठेवण्याबाबत संबंधित दुकानांना सूचना देण्यात आल्या आहेत. प्रत्येक तालुका आणि गाव पातळीवर देखील आवश्यक औषध दुकाने सुरू राहतील, यादृष्टीने प्रशासन विशेष प्रयत्न करीत आहे.

या आणीबाणीच्या परिस्थितीत कायदा व सुव्यवस्था आणि आरोग्य सेवा विस्कळीत होऊ नये म्हणून जिल्हाधिकारी, पोलीस प्रशासन, जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, इंडियन मेडिकल असोसिएशन तसेच खाजगी व निमसरकारी रुग्णालयांच्या प्रशासनाशी संपर्क साधून आवश्यक ती सर्व खबरदारी घेतली जात आहे.

नागरिकांनी या बंदच्या काळात कोणत्याही प्रकारच्या अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन अन्न व औषध प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. औषध पुरवठ्याबाबत नागरिकांना कोणतीही अडचण किंवा तातडीची गरज भासल्यास, अमरावती कार्यालयात विशेष नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. नागरिक ०७२१-२६६५८९२ या दूरध्वनी क्रमांकावर किंवा jcamrawati2022@gmailed.com या ई-मेलवर संपर्क साधू शकतात. आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना तातडीने औषधे उपलब्ध करून देण्यास प्रशासन पूर्ण मदत करेल, अशी ग्वाही डॉ. माणिकराव यांनी दिली आहे.

## अमरावतीत १९ मे रोजी रोजगार मेळावा

### ◆ महिंद्र ॲन्ड महिंद्र' कंपनीत हजार जागांवर प्रधानमंत्री इंटर्नशिपची संधी

प्रतिनिधी १५ मे

**अमरावती:** नोकरीच्या शोधात असलेल्या सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि मॉडेल करियर सेंटर, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या १९मे २०२६ रोजी 'पं. दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे' आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात महिंद्र ॲन्ड महिंद्र, पुणे कंपनीमध्ये शासन मान्यताप्राप्त 'प्रधानमंत्री इंटर्नशिप' करण्याची संधी जिल्ह्यातील उमेदवारांना मिळणार आहे.

या मेळाव्याच्या माध्यमातून कंपनीतील हजारहून अधिक रिक्त पदांसाठी भरती प्रक्रिया राबवली जाईल. यासाठी १० वी, १२वी आणि आय.टी.आय. उत्तीर्ण असलेले तसेच १८ ते २५ वर्षे वयोगटातील उमेदवार पात्र असणार आहेत. निवड झालेल्या उमेदवारांना प्रति महिना एकूण १८ हजार ५५ रुपये विद्यावेतन दिले जाईल. यामध्ये ९ हजार ५५ रुपयांसह प्रधानमंत्री इंटर्नशिप योजनेच्या अंतर्गत मिळणाऱ्या भत्त्याचा समावेश आहे. याशिवाय उमेदवारांना कंपनीकडून जेवण आणि बस सुविधा पूर्णपणे मोफत पुरवली जाणार आहे.

## १३.६०० किलो गांजासह एकाला अटक

### ◆ २३.७२ लाखांचा मुद्देमाल जप्त; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

प्रतिनिधी १५ मे

**तिवसा :** चारचाकी वाहनातून गांजा तस्करी करणाऱ्या एकाला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली. त्याच्याकडून ९३ ना किलो ६०० ग्रॅम गांजासह वाहन असा २३ लाख ७२ हजार , रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई गुरुवार, १४ मे रोजी दुपारी तिवसा-कुऱ्हा मार्गावरील शेंदूरजना बाजारनजीक करण्यात आली.

मोहन मनदेव चव्हाण (२८) रा. मांजरी म्हसला असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. एका चारचाकी वाहनातून मोहन चव्हाण नामक व्यक्ती हा तिवस्यावरून कुऱ्हा मार्गे अमरावतीच्या दिशेने गांजा घेऊन जाणार असल्याची माहिती गस्तीवर असलेल्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली.

या माहितीच्या आधारावर पथकाने तिवसा-कुहा मार्गावरील शेंदूरजना बाजारनजीक सापळा रचून सदर वाहन अडविले. पथकाने चालक मोहन चव्हाण याला ताब्यात घेऊन त्याच्याकडून १८ लाख ७२ हजार रुपये किमतीचा ९३ किलो ६०० ग्रॅम गांजा, दोन नंबर प्लेट आणि चारचाकी वाहन असा २३ लाख ७२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. त्यानंतर आरोपी मोहन चव्हाणला पुढील कारवाईसाठी जप्त मुद्देमालासह तिवसा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक मुलचंद भांबुरकर व सागर हटवार, सचिन मिश्रा, शकील चव्हाण,, अमोल देशमुख, सुधीर बावणे, सचिन मसांगे, दिनेश कनोजिया, नीलेश डांगोरे, रवींद्र बावणे, बळवंत दाभणे, भूषण पेठे, पंकज फाटे, संजय प्रधान, हर्षद घुसे, अरविंद गावंडे यांनी केली.

## पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा शनिवारी जिल्हा दौरा

प्रतिनिधी १५ मे

**अमरावती :** पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे शनिवार, दि. १६ मे रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत.

दौऱ्यानुसार, बावनकुळे यांचे शनिवार, दि. १६ मे रोजी सकाळी ९.४५ वाजता दर्यापूर हेलिपॅडवर आगमन होईल. त्यानंतर सकाळी १० वाजता दर्यापूर उपविभागीय कार्यालय येथे आढावा बैठकीला उपस्थित राहतील. दुपारी १ वाजता अमरावती येथे जिल्हाधिकारी कार्यालय सभागृहात खरीप हंगाम पूर्वतयारी आढावा सभेला उपस्थित राहतील. तसेच दुपारी ३ वाजता अमरावती जिल्हा परिषद कार्यालय सभागृहात बैठक घेतील. त्यानंतर दुपारी ५.३० वाजता अमरावती येथून नागपूरकडे प्रयाण करतील.

## बकरी ईदच्या अगोदर गोवंशाचे टॅगींग करावे

### ◆ जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

प्रतिनिधी १५ मे

**अमरावती:** बकरी ईदच्या दिवशी गोवंशाचा बळी देऊ नये, यासाठी पशूसंवर्धन विभागाने प्राण्यांचे टॅगींग करावे, यासाठी महापालिकास्तरावर टॅगींग करण्यासंदर्भात जनजागृती करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात प्राणीक्लेश समितीची बैठक पार पडली. यावेळी जिल्हा पोलिस अधीक्षक निकेतन कदम, पोलिस उपायुक्त गणेश शिंदे, पशूसंवर्धन उपायुक्त डॉ. संजय कावरे उपस्थित होते.

जिल्हाधिकारी येरेकर यांनी गोवंशाच्या कत्तलीवर बंदी आहे. जिल्ह्यात कत्तलखाना नसल्याने अवैध कत्तलीचा प्रकार होऊ नये, यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. त्यासोबतच नियमानुसार गोवंशाचे मांस बाळगणे आणि इतर राज्यातून मांसाची वाहतूक करणे गुन्हा आहे. गोवंशाची अवैध वाहतूक रोखण्यासाठी शहरात ८ ठिकाणी चेकपोस्ट उभारण्यात आले आहे. गोवंश वाहतुकीसाठी नियम आहेत. त्यामुळे नियमानुसार वाहतूक होत नसल्यास प्राण्यांवरील क्रूरता या कलमाखाली गुन्हा नोंदविण्यात येणार आहे. गोवशांची कत्तल रोखण्यासह गोवंशाचे लसीकरण, आहार योजना परिणामकारकरित्या राबविणे आवश्यक आहे.

महापालिका क्षेत्रात विना टॅगींगची जनावरे टॅगींग करण्यासाठी जनजागृती करावी. त्यानंतर टॅगींग झालेली नाहीत, अशी जनावरे गोरक्षण संस्थांमध्ये पाठविण्यात यावी. बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर कत्तलीचे प्रकार रोखण्यासाठी जनावरांच्या अवैध वाहतुकीवर कारवाई करण्यात यावी. न्यायालयात प्रकरण सुरू असताना जप्त केलेले वाहन सोडण्यात येऊ नये, यासाठी न्यायालयात अर्ज सादर करावा. पोलिस आणि परिवहन विभागाने याबाबत कारवाई केल्यास अवैध वाहतूक करणाऱ्यांना धाक निर्माण होण्यास मदत होणार असल्याने परिणामकारक कारवाई करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी यांनी दिल्या.

## पी.आर. पोटे. पाटील इंटरनॅशनल स्कूलची राजेश्वरी राठोड जिल्ह्यातून द्वितीय

प्रतिनिधी १५ मे

**अमरावती:** बारावी सीबीएसई परीक्षेच्या निकालात विद्यार्थिनी राजेश्वरी राठोड हिने जिल्ह्यात द्वितीय क्रमांक पटकावत पी .आर. पोटे पाटील कनिष्ठ महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. तिच्या या दैदिप्यमान यशामुळे संपूर्ण महाविद्यालय परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. राजेश्वरी राठोड हिने कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण अभ्यास आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाच्या बळावर हे यश संपादन केले. तिच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे महाविद्यालयाचे नाव राज्यभर उज्ज्वल झाले असून विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांकडून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षकवृंद तसेच संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी राजेश्वरीचे विशेष कौतुक करत तिच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी ङ्गविद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी संस्थेचे सातत्यपूर्ण प्रयत्नच या यशामागील खरी ताकद आहे,ङ्ग असे मत व्यक्त करण्यात आले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष , उपाध्यक्ष, संचालक यांनी विद्यार्थिनीचे अभिनंदन करून भविष्यातही असेच यश संपादन करण्यासाठी प्रेरित केले. राजेश्वरी राठोड हिच्या या यशामुळे परिसरात महाविद्यालयाचा गौरव अधिक वाढला आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

शुक्रवार दि १५ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## मतदार याद्यांची 'विशेष सखोल पुनरिक्षण' मोहिम

**वाशीम :** भारत निवडणूक आयोगाने देशातील १६ राज्ये आणि ३ केंद्रशासित प्रदेशांमध्ये 'विशेष सखोल पुनरिक्षण' (एंईं) मोहिमेचा तिसरा टप्पा जाहीर केला आहे. या मोहिमेत महाराष्ट्राचा समावेश असून, राज्यातील सुमारे ९ कोटी ८६ लाख मतदारांच्या नोंदींची प्रत्यक्ष पडताळणी केली जाणार आहे. बीएलओच्या प्रत्यक्ष घरांना भेटी महाराष्ट्रात विशेष सखोल पुनरिक्षण मोहीम अत्यंत व्यापक स्वरूपात राबवण्यात येणार आहे. यात राज्यातील एकूण ९,८६,४४,४१३ मतदारांच्या तपशिलाची खातरजमा मतदान केंद्रस्तरीय अधिका-यांमार्फत (BLO) नियुक्त करण्यात येणार आहे. हे अधिकारी प्रत्येक मतदाराच्या घरी जाऊन माहिती गोळा करतील. या प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी राजकीय पक्षांतर्फे नेमण्यात आलेले 'बूथ लेव्हल एजंट्स' BLA त्यांना सहकार्य करणार आहेत.

**जनगणनेच्या कामाशी सांगड :** सध्या सुरू असलेल्या जनगणनेच्या कामात व्यस्त असलेल्या क्षेत्रीय यंत्रणेचा विचार करून या तिसऱ्या टप्प्याचे वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील ही प्रक्रिया जून महिन्यापासून सुरू होऊन ऑक्टोबरमध्ये पूर्ण होईल.

## जिल्ह्यासाठी द्या ५ हजार कोटीचा निधी...

# थांबवा श्रेयवादाचा विधी, विकास करा आधी !

## आम आदमी पार्टीचे पश्चिम विदर्भाचे प्रवक्ता सागर कोकास यांचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

विदर्भातील विकासापासून दूर असलेल्या आणि देशात आकांक्षीत असलेल्या वाशीम जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासासाठी तातडीने पाच हजार कोटीच्या विकास आराखड्यास शासनाने मान्यता देण्याची मागणी आम आदमी पार्टीचे पश्चिम विदर्भाचे प्रवक्ता तथा वाशीमचे भूमिपुत्र सागर कोकास यांनी राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांना एक एप्रिल रोजी दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

या निवेदनात सागर कोकास यांनी विदर्भातील वाशीम जिल्हा हा आजही विकासाच्या मुख्य प्रवाहापासून वंचित आहे. वाशीम जिल्हा औद्योगिक, शैक्षणिक, कृषी व रोजगार या क्षेत्रात मागासलेला आहे. जिल्ह्याची भौगोलिक, कृषी आणि मानवी संसाधनाची क्षमता लक्षात घेतल्यास योग्य नियोजन व गुंतवणूक केल्यास वाशीम जिल्हा हा प्रगतीच्या दिशेने वेगाने वाटचाल करु शकतो असा दावाही कोकास यांनी केला आहे. वाशीम जिल्हासाठी पाच हजार कोटी रूपयाचा तातडीने विकास आराखडा मंजूर करून जिल्ह्यातील सर्व तालुक्यांचा त्यांच्या क्षमतेनुसार विकास करण्यात यावा. प्रामुख्याने कारंजा (लाड) शहर हे वाशीम जिल्ह्यातील दर्जेदार शिक्षणाची पंढरी आहे. शासनाने कारंजा शहराला 'एज्युकेशनल हब' म्हणून विकसित करावे. त्या ठिकाणी अभियांत्रिकी, मेडीकल, पॉलीटेक्नीक, स्कील डेव्हलपमेंट सेंटर, डीजीटल लर्निंग कॅम्पस उभारण्यात यावे. यामुळे जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण स्थानिक स्तरावर उपलब्ध होईल असेही या निवेदनात सागर कोकास यांनी स्पष्ट केले आहे.



रिसोड तालुक्याला कृषी हब म्हणून विकसित करावे. त्या ठिकाणी आधुनिक शेतीचे तंत्रज्ञान, कोल्ड स्टोरेज, अन्नप्रक्रिया उद्योग,, कृषी संशोधन केंद्र, शेतकरी प्रशिक्षण केंद्र-संस्था सुरू कराव्यात. तसेच कापूस आणि सोयाबीन व ईतर पिकांवर आधारीत सुरू करून शेतकऱ्यांचे आर्थिक जीवनमान उंचावण्यासाठी शासनाने पुढाकार घेण्याची गरज असल्याचेही कोकास यांनी या निवेदनात नमूद केले आहे. मंगरूळपिर येथे लघु व मध्यम व्यावसायिकांसाठी लघु व्यावसायिक केंद्र उभारून एमएसएमईचे विशेष प्रोत्साहन द्यावे. त्यामध्ये लघु उद्योग, व्यापार, मार्केट यार्ड, वेअरहाऊस आणि सेवा उद्योगांना चालना दिल्यास मंगरूळपिर तालुक्याची अर्थव्यवस्था मजबूत होईल असेही सागर कोकास यांनी या निवेदनात म्हटले आहे. वाशीम आणि मालेगाव येथे औद्योगिक विकास केंद्र विकसित करण्यासाठी दोन्ही ठिकाणी नवीन औद्योगिक प्रकल्प सुरू करावेत, एमआयडीसी क्षेत्राचा विस्तार करून येथे आयटी पार्क, अँग्रो इंडस्ट्रीज, मॅन्यूफॅक्चरींग युनिटस व लॉजीस्टिक हब विकसित करावे. यामुळे मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होईल आणि जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाला गती मिळेल असा दावाही सागर कोकास यांनी या निवेदनात केला आहे. जिल्यातील सर्व तालुक्याच्या ठिकाणी रोजगार व कौशल्य विकासासाठी कौशल्य विकास केंद्र, आयटीआय, सूरू करून युवकांना रोजगाराभिमूख प्रशिक्षण द्यावे. तसेच त्यांना थेट रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात. जिल्ह्यात सर्वत्र पायाभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. यामध्ये रस्ते, पाणी, विज, सिंचन आणि डीजीटल कनेक्टीव्हीटीमध्ये करून जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासाला गती देण्याची मागणीही कोकास यांनी या निवेदनातून मुख्यमंत्री महोदयांना केली आहे. शासनाने पाच हजार कोटीचा निधी वाशीम जिल्ह्यासाठी तातडीने द्यावा, यामध्ये कारंजा लाड येथे एज्यूकेशनल हबसाठी एक हजार कोटी, रिसोड येथे कृषी हब साठी एक हजार कोटी, मंगरूळपिर येथे लघुउद्योग व व्यापार विकासाठी ७५० कोटी, वाशीम आणि मालेगाव च्या औद्योगिक प्रकल्पासाठी एक हजार ५०० कोटी, कौशल्य विकास व रोजगारासाठी ५०० कोटी आणि पायाभूत सुविधेसाठी २५० कोटी रूपयाच्या निधीचे नियोजन करून तातडीने आकांक्षीत असलेल्या वाशीम जिल्ह्याला विकसित करून सुजलाम-सुफलाम करण्यासाठी मुख्यमंत्री महोदयांनी पुढाकार घेण्याची विनंतीही आपचे पश्चिम विदर्भाचे प्रवक्ता सागर कोकास यांनी केली आहे.

### सागर कोकास यांचा वाशीम जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासासाठी पुढाकार

वाशीम शहराचे भूमिपुत्र असलेले सागर कोकास यांनी वाशीम शहरासह जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासासाठी पुढाकार घेतला आहे. जनसामान्यांचे प्रश्न सोडवून जिल्ह्याच्या विकासाला चालना देण्यासाठी आणि देशभरात आकांक्षीत जिल्ह्याची नोंद असलेल्या वाशीम जिल्ह्याला सुजलाम-सुफलाम करण्यासाठी आपला सदैव पुढाकार राहणार असल्याचा दावा सागर कोकास यांनी केला आहे. सद्या वाशीम जिल्ह्यात सत्ताधारी पक्षाचे पाच आमदार असून एक आमदार विरोधी पक्षाचे आहेत. तसेच विद्यमान खासदारही विरोधी पक्षाचे आहेत. यामध्ये तिन आमदार विधान परिषद सदस्य असून तिघेही सत्ताधारी पक्षातील आहेत. तर विधानसभेमध्ये वाशीम व कारंजाचे आमदार सत्ताधारी पक्षाचे आणि रिसोडचे एकमेव आमदार हे विरोधी पक्षाचे नेतृत्व करतात. या सर्व लोकप्रतिनिधींनी सुद्धा जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासासाठी पुढाकार घेण्याची गरज असल्याची जनतेत चर्चा आहे.


आजी-माजी झकास, वाशीम शहर भकास, कोण करणार विकास, एकमेव पर्याय सागर कोकास..!

सिटी न्यूज वाशीम

मुख्यमंत्री साहेब रोजच या हो, शहरातील रस्ते करा हो!

वृक्ष ऐवजी आम्हाला तोडा!

आता थेट न्यायालयात लढा!

## वार्ड क्रं. ९ मध्ये सुविधांचा अभाव,

# निधी वाटपात भेदभाव !

### अण्णाभाऊ साठे योजनेतील निधी वाटपात भेदभावाचा आरोप नगरसेविका पूजा भालेराव यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

नगरपरिषद अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेतील निधी वाटपात भेदभाव झाल्याचा गंभीर आरोप नगरसेविका पुजा भालेराव यांनी केला आहे.

यासंदर्भात त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार सादर केली. सन २०२५-२६ अंतर्गत अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेतून सुमारे २ कोटी ४३ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला असताना अनुसूचित जाती महिला राखीव प्रभाग क्रमांक १ ला एक रुपयाचाही निधी देण्यात आला नसल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. नगरसेविका पूजा भालेराव यांनी दिलेल्या निवेदनात प्रभागातील दलित वस्त्यांमध्ये रस्ते, नाल्या, पिण्याचे पाणी व इतर मूलभूत सुविधांची अवस्था अत्यंत खराब असल्याचे नमूद केले आहे. तसेच निधी वाटपात जाणूनबुजून अन्याय झाल्याचा आरोप करत संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी करण्यात आली आहे.



या प्रकरणाची सात दिवसांत चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अन्यथा उच्च न्यायालयात दाद मागण्याचा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. या तक्रारीमुळे वाशिम नगरपरिषदेत निधी वाटपाचा मुद्दा पुन्हा चर्चेचा विषय ठरला आहे.

### वार्डात सुविधांचा अभाव, कसा होणार निभाव

शहरातील वार्ड क्रं. ९ मध्ये रस्ते, नाल्या, पाणी , लाईट अशा मुलभूत सुविधांचा अभाव असून नागरिकांचा जीवन जगतांनाच कसा होणार निभाव असा प्रश्न करत निधी वाटपात नगर पालिकेने भेदभाव केल्याचा आरोप नगरसेविका पुजा भालेराव यांनी केला आहे. त्यामुळे भेदभाव न करता समान न्याय देत निधी वाटप करावा अशी मागणीही पुजा भालेराव यांनी केली आहे.

### टक्केवारीसाठी मनोमिलन नगरसेविका करणार आंदोलन

निधी वाटप प्रकरणी भेदभाव करून ठेकेदार अधिकारी व सत्ताधारी यांचे टक्केवारीसाठी मनोमिलन होत आहे. तर या सर्व टक्केवारीच्या प्रकारात निधी वाटपात भेदभाव करून गरीब जनतेवर अन्याय होत आहे. त्यामुळे अन्यायाच्या विरोधात न्याय मागण्यासाठी नगरसेविका पुजा भालेराव तीव्र आंदोलन छेडणार असल्याचा इशाराही निवेदनात दिला आहे.

## मान्सूनच्या तोंडावर महावितरणचा भोंगळ कारभार उघड!

### ३ कोटी ६७ लाखांची देणी थकीत; संतप्त कंत्राटदारांचा इशारा, 'आता काम बंदच!'

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

एकीकडे वीज ग्राहकांकडून वेळेवर बिल वसुली करत कोट्यवधी रुपये गोळा करणारे महावितरण, तर दुसरीकडे स्वतःची कामे करणाऱ्या कंत्राटदारांची देणी महिनोनमहिने थकवून बसल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. मान्सूनपूर्व देखभाल आणि दुरुस्तीची अत्यावश्यक कामे ठप्प होण्याच्या मार्गावर असून, तब्बल ३ कोटी ६७ लाख रुपयांची बिले रखडल्याने संतप्त कंत्राटदारांनी आता थेट कामबंद आंदोलनाचा इशारा दिला आहे.

गेल्या ऑक्टोबर महिन्यापासून 'ब्रेकडाऊन मेंटेनन्स' अंतर्गत करण्यात आलेल्या कामांचे पैसे अदा न झाल्याने कंत्राटदार आर्थिकदृष्ट्या अक्षरशः कोलमडले आहेत. अनेकांनी कर्ज काढून कामे पूर्ण केली, मजुरांचे पगार दिले, साहित्य खरेदी केले; मात्र महावितरण प्रशासनाने देयकांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचा आरोप होत आहे. विशेष म्हणजे, या संदर्भात स्थानिक कार्यालयापासून ते मुंबई मुख्यालयापर्यंत वारंवार पाठपुरावा करूनही अधिकारी वर्गाकडून केवळ टोलवाटोलवी केली जात असल्याचा संताप कंत्राटदारांनी व्यक्त केला आहे. ई-मेलद्वारे तक्रारी, निवेदने आणि




मागण्या करूनही प्रशासनाने कोणतीही ठोस भूमिका घेतलेली नाही. दरम्यान, वाशिमचे अधीक्षक अभियंता अजय शिंदे यांच्या कार्यपद्धतीवरही गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. 'कमिशनशिवाय बिले मंजूर होत नाहीत. कमिशनची पूर्तता न झाल्यामुळेच देयके मुद्दाम अडवली जात आहेत,' असा थेट आणि खळबळजनक आरोप कंत्राटदारांच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे.

या आरोपांमुळे महावितरणच्या भ्रष्ट कारभाराची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. मान्सूनच्या पार्श्वभूमीवर वीज लाईन दुरुस्ती, झाडांच्या फांद्या छाटणे, डीपी देखभाल, तुटलेल्या तारांची दुरुस्ती यांसारखी महत्त्वाची कामे तातडीने होणे आवश्यक असताना प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे संपूर्ण यंत्रणाच धोक्यात आली आहे.

कंत्राटदारांनी कामांवर बहिष्कार टाकल्यास पावसाळ्यात वारंवार वीज खंडित होण्याची शक्यता निर्माण झाली असून त्याचा फटका थेट सर्वसामान्य नागरिकांना बसणार आहे. वीजबिलासाठी ग्राहकांच्या घराचे कनेक्शन तोडणारे महावितरण, स्वतः मात्र कंत्राटदारांची कोट्यवधींची देणी थकवून बसले आहे. त्यामुळे 'जनतेसाठी वेगळा नियम आणि अधिकाऱ्यांसाठी वेगळा?' असा संतप्त सवाल आता उपस्थित केला जात आहे. दरम्यान, या गंभीर प्रकरणी संबंधित अधिकारी वर्गाशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला; मात्र संपर्क होऊ शकला नाही.

### खुल्या प्रवर्गातील आर्थिक दुर्बलांसाठी मोफत ड्रोन प्रशिक्षण

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

शेतीपासून फोटोग्राफी, सर्वेक्षण, सुरक्षा आणि विविध तांत्रिक कामांमध्ये आज ड्रोनचा मोठ्या प्रमाणावर वापर होत आहे. ड्रोन चालवण्याचे व्यावसायिक प्रशिक्षण घेण्यासाठी सामान्यतः लाखो रुपये खर्च करावे लागतात. मात्र, महाराष्ट्र शासनाच्या अमृत संस्थेमार्फत खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील युवकांना हे प्रशिक्षण पूर्णपणे मोफत दिले जात आहे. 'अमृत ड्रोन मिशन' अंतर्गत ड्रोन ऑपरेटर (पायलट) प्रशिक्षण करण्यात आले.

## शिक्षकांच्या प्रश्नांसाठी आ. श्रीकांत देशपांडे आक्रमक !

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

शिक्षक आघाडी वाशिम जिल्ह्याच्या वतीने अमरावती विभागाचे माजी राज्यमंत्री दर्जा तथा माजी शिक्षक आ. श्रीकांत देशपांडे यांचा १४ मे २०२६ रोजी वाशिम दौरा आयोजित करण्यात आला. दौऱ्याची सुरुवात स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करून करण्यात आली.



यानंतर आ. श्रीकांत देशपांडे यांनी जि.प. चे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांची भेट घेऊन खाजगी प्राथमिक शाळेतील शिक्षकांच्या समायोजन प्रक्रियेबाबत चर्चा केली. समायोजन प्रक्रिया लवकरच राबविण्यात येईल, असे आश्वासन यावेळी देण्यात आले. त्यानंतर माध्यमिक शिक्षणाधिकारी धुपे मॅडम यांच्याशी संच मान्यता व पोस्टमॅपिंग संदर्भात सकारात्मक चर्चा करण्यात आली. तसेच नव्याने रुजू झालेले पोलीस अधीक्षक नितेश खातमोटे यांचे स्वागत करून जिल्ह्यातील कॉफी प्रकरणात शिक्षकावर दाखल एफआयआर संदर्भात चर्चा करण्यात आली.

यावर सकारात्मक मार्ग काढण्याचे आश्वासन पोलीस अधीक्षकांनी दिले. या दौऱ्यात शिक्षक आघाडीचे मार्गदर्शक दिलीपजी जोशी सर, जिल्हाध्यक्ष रमेश आरू सर, अढाव सर, जिल्हा उपाध्यक्ष रवि अंभोरे सर, निवासी उपाध्यक्ष श्रीकांत जोशी सर, रिसोड तालुकाध्यक्ष घुगे सर यांच्यासह शिक्षक आघाडीचे पदाधिकारी, शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### थोडक्यात

### देशव्यापी औषध विक्रेता बंदच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासन सतर्क

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

अखिल भारतीय औषधी विक्रेता संघटना यांच्या वतीने बुधवार दि. २० मे २०२६ रोजी देशव्यापी एक दिवसीय बंदची घोषणा करण्यात आली आहे. संघटनेच्या प्रलंबित मागण्यांच्या निषेधार्थ देशभरातील ठोक व किरकोळ औषध विक्रेत्यांनी व्यवहार बंद ठेवण्याचे आवाहन केले आहे.

या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात नागरिकांना आवश्यक औषधांचा पुरवठा सुरळीत व अखंडपणे उपलब्ध राहावा यासाठी अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, वाशिम कार्यालयामार्फत आवश्यक उपाययोजना करण्यात येत असल्याची माहिती गजानन घिरके, सहाय्यक आयुक्त (औषधे), अन्न व औषध प्रशासन, वाशिम यांनी दिली आहे. सहआयुक्त (औषधे), अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या निर्देशानुसार जिल्ह्यातील सर्व औषध विक्रेते, रुग्णालयांशी संलग्न औषध दुकाने तसेच २४ तास सुरू असणाऱ्या औषध दुकानांशी समन्वय साधण्यात येत आहे. अत्यावश्यक औषधांचा पुरवठा खंडित होणार नाही यासाठी संबंधितांना आवश्यक सूचना देण्यात आल्या असून औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध ठेवण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, शिक्षणाचे बदलणार समीकरण!

### विद्या भारतीच्या आचार्य प्रशिक्षण वर्ग कार्यालयाचे उद्घाटन
### राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावर आधारित शिक्षक घडविण्याचा संकल्प

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

विद्या भारती विदर्भ प्रांत, जिल्हा वाशिम अंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या आचार्य प्रशिक्षण वर्गाच्या कार्यालयाचे उद्घाटन बुधवारी (दि. १३ मे २०२६) रोजी रेखाताई राष्ट्रीय विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. कार्यक्रमात शिक्षण, संस्कार आणि राष्ट्रनिर्मितीचा दृढ संदेश देण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा संघचालक श्री. शंकररावजी ढोकळे हे होते. उद्घाटक म्हणून विदर्भ देवगिरी प्रांताचे संघटन मंत्री श्री. शैलेशजी जोशी उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून विद्या भारती विदर्भ प्रांताचे अध्यक्ष श्री. सचिनजी जोशी, वाशिम नगरपरिषदेचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष श्री. अनिलभाऊ केंदळे, विद्या



भारती विदर्भ प्रांताचे उपाध्यक्ष ॲड. सत्यानंदभाऊ कांबळे, सामाजिक कार्यकर्ते श्री. रामदासजी चांदवानी तसेच विभागीय कार्यवाहक श्री. विक्रमजी बावरे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाची सुरुवात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून माँ सरस्वती, आणि भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर मंचावरील सर्व मान्यवरांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. प्राध्यापक दिलीप जोशी यांनी आचार्य प्रशिक्षण वर्गाच्या उद्देशावर सविस्तर प्रास्ताविक केले. उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना श्री. शैलेशजी जोशी यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावर आधारित हा प्रशिक्षण वर्ग शिक्षकांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे सांगितले. 'आचार्य आणि विद्यार्थी यांच्या व्यक्तिमत्त्व विकासातून सक्षम राष्ट्रनिर्मिती साध्य करणे हाच या प्रशिक्षण वर्गाचा मुख्य उद्देश आहे,' असे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी श्री. सचिनजी जोशी व श्री. विक्रमजी बावरे यांनीही शिक्षक प्रशिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करत उपस्थित आचार्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. कार्यक्रमास आचार्य प्रशिक्षण वर्गासाठी इच्छुक शिक्षकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. या प्रसंगी प्राचार्य विशाल कोल्हे, प्राचार्या सौ. भावना सुतवणे, मनोज सुतवणे, प्रा. डॉ. राजेश जोशी, श्रीपाद लक्रस, बंटीभाऊ सेठी यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. गजानन लादे यांनी तर आभार प्रदर्शन श्री. रमेश आरू सर यांनी केले. शेवटी श्री. श्रीकांत जोशी सर यांनी शांतिमंत्राने कार्यक्रमाची सांगता केली.

## एलपीजी गॅस वितरणाबाबत प्रशासनाच्या कडक सूचना

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

सध्या एलपीजी गॅस पुरवठ्याबाबत निर्माण झालेल्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सर्व गॅस एजन्सी चालक व वितरकांनी सर्वसामान्य नागरिकांना नियमित, पारदर्शक व सुरळीत गॅस पुरवठा उपलब्ध करून द्यावा तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी प्रशासनाने विविध निर्देश जारी केले आहेत.

तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी कारंजा यांनी दिलेल्या सूचनांनुसार, कोणत्याही परिस्थितीत एलपीजी गॅस सिलेंडरची अनधिकृत साठवणूक अथवा कृत्रिम टंचाई निर्माण करू नये. उपलब्ध गॅस साठ्याची माहिती एजन्सीच्या दर्शनी भागात स्पष्टपणे प्रदर्शित करणे बंधनकारक करण्यात आले आहे. गॅस एजन्सी व वितरण व्यवस्था नियमित वेळेत सुरू ठेवण्याचे निर्देश देण्यात आले असून, ग्राहकांना वेळेत सिलेंडर वितरणासाठी पुरेसे कर्मचारी व वाहने उपलब्ध ठेवण्यास सांगण्यात आले आहे. वितरण प्रक्रियेत कोणताही भेदभाव न करता घरगुती ग्राहक, रुग्णालये, वसतिगृहे, शासकीय संस्था तसेच अत्यावश्यक सेवांना प्राधान्याने गॅस पुरवठा करावा, असेही निर्देश आहेत. ऑनलाईन बुकिंग केलेल्या ग्राहकांनाच सिलेंडर वितरण करण्यात यावे तसेच एका दिनांकाच्या ऑनलाईन बुकिंगचे पूर्ण वितरण झाल्यानंतरच पुढील तारखेच्या बुकिंगचे वितरण करावे, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

प्रशासनाने नागरिकांमध्ये घबराट निर्माण होऊ नये यासाठी अतिरिक्त सिलेंडर बुकिंग अथवा साठवणूक टाळण्याचे आवाहन केले असून, याबाबत माध्यमांद्वारे जनजागृती करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
शुक्रवार, दि. १५ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## लग्नासाठी आलेल्या तरुणाची आत्महत्या

**खामगाव:** तालुक्यातील पळशी खुर्द शिवारात २४ वर्षीय तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. मावस बहिणीच्या लग्नासाठी पाहुणा म्हणून आलेल्या तरुणाने आजारपणाला कंटाळून हे टोकाचे पाऊल उचलल्याची माहिती समोर आली असून, परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. अकोला जिल्ह्यातील उगवा येथील शिवम गजानन घोडे (२४) हा आपल्या कुटुंबासह पळशी खुर्द येथे चुलत मावस बहिणीच्या लग्नासाठी आला होता. बुधवारी दुपारी ३ ते सायंकाळी ६ वाजताच्या दरम्यान पळशी शिवारातील रामचंद्र लोखंडे यांच्या शेतात त्याने गळफास घेत आत्महत्या केली. मृतक शिवम हा गेल्या काही दिवसांपासून फिटच्या आजाराने त्रस्त होता. सततच्या आजारपणामुळे मानसिक त्रासातून त्याने आत्महत्या केल्याचे त्याचा भाऊ विशाल गजानन घोडे यांनी पोलिसांना दिलेल्या माहितीत नमूद केले आहे.

# पीडितेच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारली

## खामगाव तालुका शिवसेनेचा सामाजिक पुढाकार

प्रतिनिधी १५ मे

**खामगाव:** सावरगाव, ता. पातूर येथील एका अल्पवयीन चिमुकलीवर झालेल्या अमानवी व संतापजनक घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरला असून या घटनेचा खामगाव तालुका शिवसेनेच्या वतीने तीव्र शब्दांत निषेध व्यक्त करण्यात आला आहे. या कठीण प्रसंगी पीडित कुटुंबाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहत सामाजिक बांधिलकी जपत त्या चिमुकलीच्या शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी स्वीकारण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते एकनाथराव शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली, .ना. भूमीपुत्र प्रतापरावजी जाधव यांच्या नेतृत्वात तसेच आमदार .बच्चू कडू यांच्या प्रेरणेतून आणि धर्मवीर आमदार संजयभाऊ गायकवाड यांच्या सहकार्याने हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी हिंदू सेवक अमोल अंधारे, प्रहार संपर्कप्रमुख मा. गजाननभाऊ



लोखंडकार तसेच शिवसेना खामगाव तालुका प्रमुख राजुभाऊ बघे यांच्या प्रमुख उपस्थितीत देऊळगाव साकर्शा येथील पोतदार प्रेप एज्युकेशन संस्थेच्या वतीने त्या चिमुकलीच्या इयत्ता १२ वी पर्यंतच्या संपूर्ण शिक्षणाची जबाबदारी स्वीकारण्यात आली.

तसेच शालेय शिक्षणासाठी लागणारे गणवेश, पुस्तके, वह्या, शैक्षणिक साहित्य तसेच इतर आवश्यक बाबींची संपूर्ण पूर्तता संस्थेमार्फत करण्यात येणार असल्याची माहिती युवा नेते तथा पोतदार प्रेप एज्युकेशन संस्थेचे मुख्य संचालक सुशिल माधव पाटील यांनी दिली. यावेळी बोलताना शिवसेना खामगाव तालुका प्रमुख राजुभाऊ बघे म्हणाले की, ह्नसमाजातील प्रत्येक मुलगी सुरक्षित व शिक्षित राहणे ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. या चिमुकलीवर ओढवलेला प्रसंग अत्यंत वेदनादायी असून अशा कठीण काळात तिच्या कुटुंबाला आधार देणे हे आपले कर्तव्य आहे. शिवसेना खामगाव तालुक्याच्या वतीने आम्ही तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी सदैव तिच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहू.

तसेच या घटनेतील आरोपीस कठोरातील कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी खामगाव तालुका शिवसेनेच्या वतीने करण्यात आली. यावेळी उपस्थित.बाळू बगाडे, सावरगाव सरपंच घनश्याम राठी,

शिवसेनेचे पिंटू पाटील धोरण,देवेश लोखंडकार विष्णू कदम,करण छापरवाल,अनुप गायकवाड, धम्मपाल गवई,संदीप राठोड,अभिषेक राठोड, सुजल गव्हाळ,अभय गीते,आदीसह शिवसैनिक व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# किरकोळ वादातून तरुणावर हल्ला; तिघांवर गुन्हा दाखल

## पिंपळगाव काळे येथील घटना; लोखंडी वस्तूने हल्ला

प्रतिनिधी १५ मे

**जळगाव जामोद:** तालुक्यातील जळगाव जामोद पिंपळगाव काळे येथे किरकोळ वादातून एका तरुणावर लोखंडी वस्तूने हल्ला करून मारहाण करण्यात आल्याची घटना घडली. या प्रकरणी जळगाव जामोद पोलिस ठाण्यात एकाच कुटुंबातील तिघांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार अनंता बाळू काकडे (३०, रा. पिंपळगाव काळे) हे बुधवार, दि. १३ मे २०२६ रोजी रात्री ११ वाजेच्या सुमारास गावातील बसस्थानक परिसरात गेले होते. यावेळी त्यांनी गावातील गोपाल खंडारे याला पोलिसांना फोन का केला, अशी विचारणा केली. या कारणावरून तेथे उपस्थित असलेल्या सुरेश दामोदर कवळकार याने संताप व्यक्त करत अनंता काकडे यांच्या तोंडावर हातातील लोखंडी वस्तूने प्रहार केल्याची तक्रार करण्यात आली आहे. अंधार असल्यामुळे नेमकी कोणती वस्तू वापरण्यात आली हे स्पष्ट होऊ शकले नाही. या हल्ल्यात अनंता काकडे जखमी झाले. तक्रारीनुसार, यानंतर प्रशांत दामोदर कवळकार यानेही 'तू आमच्या मध्ये कशाला बोलतो?' असे म्हणत शिवीगाळ करून मारहाण केली. तसेच दामोदर कवळकार यांनीही वादात हस्तक्षेप करत मारहाण व शिवीगाळ केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी जळगाव जामोद पोलिसांनी सुरेश कवळकार, प्रशांत कवळकार व दामोदर कवळकार यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत कलम ११५ (२), ११८(१), ३५२ आणि ३(५) अन्वये गुन्हा नोंदविला आहे. पुढील तपास प्रभारी अधिकारी नितीनकुमार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक अमोल पंडित करीत आहेत.

# हरभरा विक्रीनंतरही चुकारे रखडले; शेतकरी आर्थिक अडचणीत

## रक्कम खात्यात जमा न झाल्याने शेतकऱ्यांत नाराजी

प्रतिनिधी १५ मे

**खामगाव:** शासनाच्या हमीभाव केंद्रावर हरभरा विक्री केलेल्या अनेक शेतकऱ्यांचे चुकारे अद्यापही प्रलंबित असल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. हरभरा विक्रीनंतर ठराविक कालावधीत पैसे मिळण्याची अपेक्षा असताना अनेक दिवस उलटूनही खात्यात रक्कम जमा झाली नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

यंदा उत्पादन खर्च वाढल्याने शेतकऱ्यांनी मोठ्या अपेक्षेने हरभरा पिकाची लागवड केली होती. मात्र, बाजारभावात चढ-उतार होत असल्याने अनेकांनी शासनाच्या खरेदी केंद्रावर हरभरा विक्री करण्याचा निर्णय घेतला. खरेदी प्रक्रिया पूर्ण होऊनही अद्याप चुकारे न मिळाल्याने शेतकऱ्यांची आर्थिक घडी विस्कळीत झाली आहे.

सध्या खरीप हंगामाच्या पूर्वतयारीला सुरुवात झाली असून बियाणे, खते, औषधे तसेच शेती मशागतीसाठी मोठ्या प्रमाणावर पैशांची गरज आहे. अशा परिस्थितीत हरभऱ्याचे पैसे अडकून पडल्याने अनेक शेतकऱ्यांना कर्ज काढण्याची वेळ येत असल्याचे चित्र आहे. काही शेतकऱ्यांनी संबंधित यंत्रणांकडे वारंवार पाठपुरावा करूनही समाधानकारक उत्तर मिळत नसल्याची तक्रार केली आहे. दरम्यान, प्रलंबित चुकारे तत्काळ शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावेत, अन्यथा आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे. शासन आणि संबंधित खरेदी यंत्रणांनी शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी होत आहे.

# पावसाळ्यात शहर तुंबणार; नालेसफाई कधी सुरू होणार?

## मागील वर्षीच्या चुका दुरुस्त करून कामाचे नियोजन

प्रतिनिधी १५ मे

**खामगाव:** येथील नगर परिषदेकडून मान्सूनपूर्व नालेसफाईच्या कामांचे नियोजन अंतिम टप्प्यात आले असून, लवकरच प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे. मात्र गेल्यावर्षी नालेसफाईवर लाखो रुपये खर्च करूनही पावसाळ्यातच नव्हे, तर अवकाळी पावसानेही शहर जलमय झाले होते. त्यामुळे पालिकेने मागील वर्षीच्या चुका दुरुस्त करून यंदा नालेसफाईचे नियोजन केले आहे.

शहरात लहान-मोठे मिळून १५ मोठे तर ३० उपनाले आहेत. दरवर्षी नाल्यांच्या स्वच्छतेसाठी कागदावर मोठा आराखडा तयार



केला जातो आणि लाखो रुपयांची तरतूद केली जाते. प्रत्यक्षात मात्र कंत्राटदारांकडून कामे दर्जेदार होतात की नाही, याकडे अधिकाऱ्यांचे पूर्णतः दुर्लक्ष होत असल्याचे चित्र आहे. मान्सूनचे आगमन जवळ आले असतानाही अद्याप अनेक ठिकाणी नालेसफाईला म्हणावी तशी गती मिळालेली नाही.गेल्या काही महिन्यांत झालेल्या अवकाळी पावसामुळे शहराच्या मुख्य रस्त्यांवर आणि सखल भागात पाणी साचले होते. थोड्याशा पावसाने ही अवस्था होत असेल, तर पावसाळ्यातील अतिवृष्टीचा सामना करण्यासाठी पालिकेची यंत्रणा सज्ज आहे का? असा प्रश्न नागरिक विचारत आहेत.शहरातील भौगोलिक परिस्थितीनुसार नगर परिषदेकडून काही विशिष्ट प्रभागांत नाल्यांचे जाळे मोठे असल्याने तिथे दरवर्षी नालेसफाईवर सर्वाधिक खर्च दाखवला जातो. मात्र, तरीही याच भागात पावसाळ्यात पाणी साचण्याच्या तक्रारी सर्वाधिक असतात.नाल्यांच्या काठावर आणि काही ठिकाणी नाल्यांवरच बांधकामे करून अतिक्रमणे करण्यात आली आहेत. त्यामुळे नालेसफाईच्या कामात मोठा अडथळा निर्माण होत आहे. ही अतिक्रमणे काढल्याशिवाय नाल्यांचे रुंदीकरण आणि सफाई होणे, सध्यातरी कठीण आहे.केवळ नाल्यांतील कचरा वर काढणे म्हणजे नालेसफाई नव्हे. नाल्यात असलेला प्लास्टिक व वर्षानुवर्षांचा गाळ काढणेही आवश्यक आहे. मात्र, अनेकदा केवळ वरवरची स्वच्छता करून बिले लाटली जातात.यंदाही नालेसफाईच्या कामासाठी खामगाव नगरपरिषदेने लाखो रुपयांचे बजेट मंजूर केले आहे. यामुळे यावर्षी कामाची गुणवत्ता राखली जाणार आणि गेल्या वर्षी नागरिकांना ज्या अडचणींचा सामना करावा लागला त्यामध्ये यावर्षी सुधारणा होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# खामगावात अवैध लाकूड साठ्यावर कारवाई कधी?

प्रतिनिधी १५ मे

**खामगाव:** बुलढाणा जिल्ह्यात लाकूड तस्करीविरोधात वन विभागाने मंगळवारी मोठी कारवाई करत सहा सॉ-मिलवर एकाच वेळी छापे टाकले. नव्याने रुजू झालेले उपवनसंरक्षक जमीर शेख स्वतः कारवाईत सहभागी झाल्याने वन विभागाच्या भूमिकेकडे विशेष लक्ष वेधले जात आहे. मात्र, दुसरीकडे खामगाव आणि शेगाव तालुक्यात विनापरवाना वृक्षतोड करून अवैध लाकूडसाठा सुरू असल्याचा आरोप होत असून, या भागात



कारवाई कधी होणार, सवाल नागरिकांकडून उपस्थित असा केला जात आहे. खामगाव व शेगाव तालुक्यात गेल्या काही महिन्यांपासून शेतशिवारातील तसेच रस्त्यालगतच्या झाडांची मोठ्या प्रमाणात कत्तल होत असल्याची चर्चा आहे. काही ठिकाणी रात्रीच्या वेळी झाडे तोडून त्याचे लाकूड गुप्त ठिकाणी साठविले जात असल्याचे सांगितले जाते. विशेष म्हणजे, काही सॉ-मिल आणि लाकूड डेपोमध्ये आवश्यक परवान्यांची पूर्तता नसतानाही व्यवहार सुरू असल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे.

**पर्यावरणप्रेमींची मागणी**

खामगाव व शेगाव तालुक्यातील संशयित लाकूड साठ्यांची तपासणी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी पर्यावरणप्रेमींकडून होत आहे. तसेच रात्रीच्या वेळी होणाऱ्या लाकूड वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी विशेष पथके नियुक्त करण्याची आवश्यकता व्यक्त केली जात आहे.

वन विभागाने जिल्ह्यात केलेल्या अलीकडील कारवाईमुळे अवैध लाकूड व्यवसायावर काही प्रमाणात दबाव निर्माण झाला असला, तरी संशयित साठ्यांवर

**अवैध वृक्षतोडीचे प्रमाण वाढले!**

ग्रामीण भागात शेतीमधील जुनी झाडे, रस्त्यालगतचे वृक्ष आणि खासगी जागांवरील लाकूड परवानगीशिवाय तोडून त्याची विक्री केली जात असल्याचे प्रकार वाढत आहेत. काही प्रकरणांत बनावट कागदपत्रांचा वापर करून लाकूड वाहतूक होत असल्याचीही चर्चा आहे. त्यामुळे वन विभागासमोर नियंत्रणाचे मोठे आव्हान उभे ठाकले आहे.

कारवाई न झाल्याने प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

# शेगावात दारूच्या पैशाच्या वादातून तरुणाचा खून

## लाकडी दांड्याने मारहाण, आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल

प्रतिनिधी १५ मे

**शेगांव:** शहरातील आठवडी बाजार परिसरात दारू पिण्यासाठी पैशांच्या कारणावरून झालेल्या वादातून एका तरुणाचा लाकडी दांड्याने मारहाण करून खून करण्यात आल्याची धक्कादायक घटना बुधवार, १३ मे रोजी सायंकाळी वाजताच्या ६:३० सुमारास घडली. या प्रकरणी शेगाव शहर पोलिस ठाण्यात गुरुवारी खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत गजानन राजू तायडे (४०, रा. धनगर नगर, शेगाव)




यांनी पोलिसांत तक्रार दिली. तक्रारीनुसार, आरोपी शेख जावेद शेख करीम (३०, रा. काँग्रेस नगर, शेगाव) याचा मृत शाहरुख हारून पटेल (३१, रा. शेगाव) याच्यासोबत दारू पिण्यासाठी पैशांच्या कारणावरून वाद झाला होता. आठवडी बाजारातील बजरंगबली मंदिराजवळ झालेल्या या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. यावेळी आरोपीने शाहरुख पटेल याच्या डोक्यात लाकडी दांड्याने जोरदार वार केले. यात गंभीर जखमी झालेल्या शाहरुखचा मृत्यू झाला.या प्रकरणी गुरुवार, १४ मे रोजी सकाळी ११:१० वाजता फिर्यादीच्या तक्रारीवरून शेगाव शहर पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम १०३(१) अंतर्गत खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेता पोलिस निरीक्षक निमिष मेहत्रे तपास करीत आहेत. तसेच उपविभागीय पोलिस अधिकारी प्रदीप पाटील यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली

# ई-पीक पाहणी नोंदणी २४ मे पूर्वी पूर्ण करा!

प्रतिनिधी १५ मे

**बुलढाणा :** शासनाच्या महत्वाकांक्षी डिजिटल क्रॉप सर्वे अंतर्गत उन्हाळी हंगाम २०२६ ई-पीक पाहणी मोहिमेला ८ एप्रिलपासून सुरुवात झाली आहे. शेतकऱ्यांनी आपल्या सातबारा उताऱ्यावर पीक पेरा स्वतः अँड्रॉईड मोबाईलद्वारे २४ मे पर्यंत नोंदविण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे यांनी केले आहे.

उन्हाळी हंगाम २०२६ ई-पीक पाहणी अंतर्गत बुलढाणा जिल्ह्यात आजपर्यंत ४७ हजार ८९४.३७ हेक्टर क्षेत्रावर नोंदणी झाली आहे. तसेच एकूण ७ लाख ९९ हजार १९५ पीक पाहणी करावयाच्या मालक प्लॉटपैकी ३७हजार ४५ प्लॉटवर संबंधित शेतकऱ्यांनी अणए व्हर्जन ४.०.६ या मोबाईल ॲपच्या माध्यमातून आपल्या पिकांची नोंदणी

### जिल्हाधिकारी यांचे आवाहन

केली आहे. उर्वरित क्षेत्रातील शेतकऱ्यांनी लवकरात लवकर ई-पीक पाहणी अ?पद्वारे पीक नोंदणी करावी, असे प्रशासनाने कळविले आहे. सदर नोंदणीसाठी अँड्रॉईड मोबाईल आवश्यक असून गुगल क्रोम अपडेट करून ई-पीक पाहणी व्हर्जन ४.०.६ ॲप मोबाईलमध्ये इन्स्टॉल करणे आवश्यक आहे.

शेतकऱ्यांनी शेत बांधावर जाऊन प्रत्यक्ष पीकांची माहिती ॲपमध्ये भरून अपलोड करावी. मोबाईल उपलब्ध नसल्यास किंवा ॲप हाताळण्यात अडचण असल्यास संबंधित गावचे तलाठी, कोतवाल, कॉमन सर्व्हिस सेंटर तसेच गावात नियुक्त करण्यात आलेल्या सहाय्यकांची मदत घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

डिजिटल क्रॉप सर्वे अंतर्गत १०० टक्के ई-पीक पाहणी नोंद करणे बंधनकारक असून उन्हाळी हंगामातील उभे पीक, कायम पड अथवा चालू पड जमिनींची नोंद करणे आवश्यक आहे. शेतकरी स्तरावर नोंदणी न झालेल्या जमिनींची ई-पीक पाहणी सहाय्यक स्तरावरून पूर्ण करण्यात येणार असल्याचेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. दरम्यान, ई-पीक पाहणी नोंदणी न केल्यास सातबारावर पीक पेरा कोरा राहणार असून त्यानंतर नोंद करता येणार नाही. त्यामुळे पीक विमा, शासकीय अनुदान व इतर लाभ मिळविण्यात अडचणी निर्माण होऊ शकतात. अवेळी पाऊस किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान भरपाई व पीक विम्यासाठी ७/१२ वर अचूक पीक नोंद असणे आवश्यक असल्याने सर्व शेतकरी बांधवांनी २४ मे २०२६ पूर्वी आपल्या पिकांची नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

# पंचायतराज अभियानाच्या निवड पध्दतीत केला बदल

प्रतिनिधी १५ मे

**शेंदुर्जन :** राज्यातील ग्रामपंचायतींचा कारभार अधिक पारदर्शक, कार्यक्षम आणि डिजिटल करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या 'मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियाना'च्या निवड प्रक्रियेत राज्य शासनाने महत्त्वपूर्ण बदल केले आहेत. यापूर्वीच्या निवड पद्धतीतील संदिग्धता दूर करून स्पर्धेत अधिक पारदर्शकता आणण्यासाठी ग्रामविकास विभागाने बुधवारी, १३ मे २०२६ रोजीनवीन शासननिर्णय (जी.आर.) निर्गमित केला आहे. स्पर्धाआता अधिक चुरशीच आहे. निवडीचे नवे टप्पेः राज्य शासनाने या अभियानांतर्गत तालुका ते राज्य स्तरापर्यंतचे निवडीचे निकष अत्यंत स्पष्ट केले आहेत. नवीन नियमांनुसार निवडीची साखळी खालीलप्रमाणे असेल. तालुका स्तर- प्रत्येक तालुक्यातील प्राप्त प्रस्तावांची छाननी करून सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या प्रथम ३ ग्रामपंचायतींची 'तालुकास्तरीय अत्युत्कृष्ट ग्रामपंचायत' म्हणून निवड केली जाईल. विशेष म्हणजे, उत्कृष्ट काम करणाऱ्या पण मुख्य स्पर्धेत मागे राहिलेल्या इतर २ ग्रामपंचायतींना 'विशेष पुरस्कार देऊन गौरविण्यात येईल. जिल्हा स्तर- तालुक्यातील प्रथम २ क्रमांकाच्या ग्रामपंचायतींना जिल्हा स्तरावरील स्पर्धेसाठी बढती मिळेल.

या सर्व प्रस्तावांतून जिल्हा समिती ३ जिल्हास्तरीय विजेत्यांची निवड करेल. विभाग स्तरः-जिल्ह्यातील प्रथम २ क्रमांकाच्या ग्रामपंचायतींच्या मूल्यांकनातून विभाग स्तरावरील ३ अत्युत्कृष्ट ग्रामपंचायती निवडल्या जातील. राज्य स्तरः- विभागातून प्रथम २ स्थानी आलेल्या ग्रामपंचायतींची नावे राज्य समितीकडे शिफारसीसह पाठवली जातील. यातून राज्याच्या ३ अंतिम विजेत्यांचीड घोषणा करण्यात येईल. निर्णयाची पार्श्वभूमी आणि महत्त्व यापूर्वीच्या नियमावलीत पुढील स्तरावर पात्र ठरणाऱ्या ग्रामपंचायतींच्या संख्येबाबत प्रशासकीय स्तरावर काही प्रमाणात संभ्रम होता. त्यामुळे गुणांकन असूनहीकाही ग्रामपंचायती संधीपासून वंचित राहत होत्या. नवीन निर्णयामुळे प्रत्येक स्तरावरून पुढील स्तरावर नेमक्या किती ग्रामपंचायती जातील, याचा स्पष्ट आराखडा तयार झाला आहे. 'ग्रामपंचायतींमध्ये निकोप स्पर्धा निर्माण व्हावी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांनी शाश्वत विकासाची उद्दिष्टे गाठावीत, हा या बदलाचा मुख्य उद्देश आहे.

# पाणी भरण्याच्या वादातून मारहाण

## तामगाव पोलिस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

प्रतिनिधी १५ मे

**संग्रामपूर:** पाणी भरण्याच्या कारणावरून एका विवाहितेला पती, सासू व अन्य दोघांनी मारहाण केल्याची घटना १३ मे रोजी सायंकाळी जस्तगाव येथे घडली. या प्रकरणी तामगाव पोलिस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लक्ष्मी प्रवीण वानखडे ह्या बुधवारी भांडी घासत असताना घरातील पाणी संपले. त्यावेळी त्यांनी त्यांच्या पतीला पाणी आणण्यास सांगितले. मात्र पतीने पाणी घेऊन येण्यास नकार दिला. त्यावेळी पती-पत्नीमध्ये वाद झाला. पतीने पत्नीला शिवीगाळ करीत मारहाण केली. त्याचवेळी विवाहितेची सासू तेथे आली. सासूनेसुद्धा सुनेला मारहाण केली. तसेच सासूने येनगाव येथील तिच्या भावाला फोन करून बोलावून घेतले असता त्याने सोबत अजून एकाला आणले. त्या दोघांनीसुद्धा विवाहितेला लाकडी काठीने मारहाण केली. फिर्यादीवरून प्रवीण वानखडे, ललिताबाई वानखडे (दोघे रा. जस्तगाव), सुपा दाभाडे व मनु सिरसाट (दोघे रा. येनगाव, ता. जळगाव जामोद) या चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

शुक्रवार, दि. १५ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


# शहरात वाहतूक नियमांचे सर्रास उल्लंघन, कारवाई कोण करणार

♦ परवाना नसतानाही अल्पवयीन मुलांच्या हाती रिक्षाचे स्टेअरिंग

प्रतिनिधी १५ मे



**अकोला :** शहरात सध्या अधिकृत रिक्षांपेक्षा अनाधिकृतपणे धावणाऱ्या रिक्षांची संख्या मोठी आहे. अनेक रिक्षाचालकांकडे परवाना नसतानाही शहरात राजरोसपणे रिक्षा चालवल्या जात आहेत. धक्कादायक बाब म्हणजे, या रिक्षांमध्ये महिला आणि तरुणींची छेडछाड होण्याच्या घटनांमध्ये वाढ होत आहे, मात्र शहर वाहतूक नियंत्रण शाखा याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचे चित्र आहे.

आजकाल शहरात अनेक अल्पवयीन मुले बिनधास्तपणे रिक्षा चालवताना दिसत आहेत. या मुलांकडे ना चालक परवाना आहे, ना परमिट. एकाच परमिटवर घरातील तीन-तीन सदस्य दिवस-रात्र रिक्षा चालवतात. विशेषतः संध्याकाळच्या वेळी हे तरुण रिक्षा चालवतात. या रिक्षांमध्ये चालकांचे मित्र आधीच बसलेले असतात. रिक्षात बसणाऱ्या महिला किंवा तरुणींशी गोड बोलून ओळख वाढवण्याचा प्रयत्न हे चालक करतात. ओळखीनंतर त्यांचे मोबाईल नंबर मिळवून संपर्क साधला जातो. यातून अनेक महिला त्यांच्या जाळ्यात अडकत आहेत, तर प्रतिसाद न देणाऱ्या महिला व तरुणींची छेड काढली जाते. अनेक रिक्षांना नियबाह्य पावर हॉर्न बसवलेले आहेत. रात्रीच्या वेळी हे हॉर्न वाजवून पादचाऱ्यांना घाबरवण्याचे प्रकार घडत आहेत. रिक्षांमध्ये कानठळ्या बसवणाऱ्या आवाजात चित्रपट गीते वाजवणे ही आता सामान्य बाब झाली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून या रिक्षाचालकांवर कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. विश्वसनीय सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, वाहतूक विभागात कार्यरत असलेल्या काही कर्मचाऱ्यांनीच रिक्षा खरेदी करून त्या भाड्याने दिल्या आहेत. यामुळेच या चालकांवर कारवाई करण्यास टाळाटाळ केली जात आहे. एखादी मोठी आणि गंभीर घटना घडण्यापूर्वीच, अशा अल्पवयीन आणि अनधिकृत रिक्षाचालकांवर संबंधित विभागाने कडक कारवाई करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

# 17 पासून अधिक मास, नाही होणार विवाह आणि गृहप्रवेश

प्रतिनिधी १५ मे

♦ भगवान विष्णू आणि त्यांच्या अवतारांची केली जाईल पूजा



**अकोला :** : सध्या ज्येष्ठ महिना सुरू आहे. या वेळी ज्येष्ठ महिन्यात एक अतिरिक्त महिना (पुरुषोत्तम महिना) असेल, म्हणजेच ज्येष्ठ महिना केवळ एक महिना न राहता दोन महिने चालेल. ज्येष्ठ कृष्ण पक्ष १६ मे पर्यंत चालेल. यानंतर, १७ मे रोजी अधिक मास सुरू होईल आणि तो १५ जून पर्यंत चालेल. त्यानंतर, ज्येष्ठ शुक्ल पक्ष सुरू होईल, जो २९ जून पर्यंत चालेल. अधिक मासात विवाह, गृहप्रवेश, मुंडन आणि यज्ञोपवीत संस्कार यांसारख्या शुभ कार्यांसाठी कोणताही शुभ मुहूर्त नसतो. ज्योतिषांच्या मते, अधिक मासात भगवान विष्णू आणि त्यांच्या अवतारांची विशेष पूजा केली जाते. हा महिना पुरुषोत्तम या नावानेही ओळखला जातो, जे भगवान विष्णूंचे दुसरे नाव आहे. या दिवसांमध्ये पवित्र स्नान, मंदिर दर्शन, धार्मिक मेळावे, मंत्रोच्चार, दानधर्म आणि पूजा यांसारखी शुभ कार्ये केली जातात. हे इंग्रजी कॅलेंडरनुसार लीप वर्ष आहे आणि हिंदी कॅलेंडरनुसार अधिक मास आहे. लीप वर्षात फक्त एक दिवस वाढवला जातो, तर हिंदी कॅलेंडरमध्ये अतिरिक्त महिन्यामुळे पूर्ण एक महिना वाढतो. हे सौर वर्ष आणि चांद्र वर्ष यांच्यातील फरकामुळे होते. लीप वर्षात एक दिवस वाढवला जातो.

इंग्रजी कॅलेंडर पृथ्वीच्या सूर्याभोवतीच्या प्रदक्षिणेवर आधारित आहे. इंग्रजी वर्षात ३६५ दिवस असतात आणि लीप वर्षात ३६६ दिवस असतात. याचे कारण असे की, पृथ्वीला सूर्याभोवती एक प्रदक्षिणा पूर्ण करण्यासाठी ३६५ दिवस आणि अंदाजे ६ तास लागतात. दर चार वर्षांनी, हे अतिरिक्त ६ तास एका दिवसाच्या बरोबरीचे होतात. या कारणामुळे, कॅलेंडरमधील एक दिवस सामान्य वर्षातील ३६५ दिवसांच्या बरोबरीचा असतो. विष्णु पुराण, श्रीमद् भागवत पुराण आणि रामायण यांचे पठण करावे. अधिक महिन्या दरम्यान भगवान विष्णूची विशेष पूजा करावी. विष्णु पुराण, श्रीमद् भागवत पुराण आणि रामायण यांसारख्या ग्रंथांचे पठण करावे. संत आणि ऋषीमुनींचे प्रवचन ऐकावे. आपल्या आवडत्या देवतेच्या मंत्रांचा जप करावा. या दिवसांमध्ये गंगा, यमुना, नर्मदा आणि शिप्रा यांसारख्या पवित्र नद्यांमध्ये स्नान करावे. नवीन स्नान करणे शक्य नसल्यास, तुम्ही पाण्यात गंगेचे पाणी मिसळून घरीच स्नान करू शकता. भगवान शिवाचा विशेष अभिषेक करावा. शिवलिंगाला चंदनाचा लेप लावावा. विडयाची पाने, धोतरा, आकड्याची फुले, दही, पंचामृत आणि मध यांसारख्या वस्तूंचा नैवेद्य दाखवावा. देवा समोर उदबत्ती लावा आणि आरती करा. 'ॐ नमः शिवाय' या मंत्राचा जप करा. घरी बसलेल्या बाळ गोपाळाचा अभिषेक करा. देवाला लोणी-खडीसाखर आणि तुळस अर्पण करा. 'के कृष्णाय नमः' या मंत्राचा जप करा. या दिवसांमध्ये जोडे, कपडे, धान्य, अन्न, तीळ, गूळ, तेल आणि पैसे दान करा. गाईंच्या देखभालीसाठी गोशाळेला पैसे दान करा. गाईंना हिरवे गवत खाऊ घाला.

# तेल्हारा शहर अवैध धंद्यांच्या विळख्यात !


प्रतिनिधी १५ मे

**तेल्हारा :** शहरात अवैध धंद्यांनी अक्षरशः मुळं रोवली असून वरली, मटका आणि गुटखा विक्रेत्यांनी शहरातील प्रमुख चौक, गल्लीबोळ आणि शाळा परिसर व्यापल्याचे गंभीर वास्तव समोर आले आहे. दिवसाढवळ्या सुरू असलेल्या या बेकायदेशीर व्यवसायामुळे शहरातील सामाजिक वातावरण बिघडत असून युवक आणि विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात आले आहे. विशेष म्हणजे शहरातील काही शाळा आणि महाविद्यालयांच्या आसपासच वरली-मटक्याचे अड्डे खुलेआम सुरू असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची पावले शिक्षणाकडून थेट जुगाराच्या अड्ड्याकडे वळत असल्याची धक्कादायक परिस्थिती निर्माण झाली आहे. अनेक विद्यार्थी या अड्ड्यांवर वेळ घालवत असल्याने पालकांमध्ये तीव्र चिंता व्यक्त केली जात आहे. स्थानिक नागरिकांच्या मते, तेल्हारातील अनेक भागात गुटखा विक्रीवर बंदी असतानाही सर्रास विक्री होत आहे. काही ठिकाणी तर भररस्त्यातच वरली आणि मटक्याचे व्यवहार सुरू असतात. 'पोलीसांना सर्व माहिती असूनही कारवाई होत नाही,' असा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. दरम्यान, या अवैध धंद्यांविरोधात आवाज उठवणाऱ्या पत्रकारांनाही दबाव आणि धमक्यांना सामोरे जावे लागत असल्याची चर्चा आहे. 'लाल नोटी देऊन पत्रकारांना लटकवू,' अशी उघड भाषा वरली बहाद्दरांकडून वापरली जात असल्याने पत्रकारितेच्या स्वातंत्र्यावरच प्रश्न निर्माण झाला आहे. पैशांच्या जोरावर सर्व काही दाबण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोपही होत आहे. नागरिकांनी अनेक वेळा पोलीस स्टेशनमध्ये तक्रारी दाखल करूनही कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तक्रारींची दखल न घेता त्या केराच्या टोपलीत टाकल्या जात असल्याचा संताप नागरिकांनी व्यक्त केला आहे. शहरात सुरू असलेल्या या अवैध धंद्यांना नेमका कोणाचा वरदहस्त आहे? विद्यार्थ्यांचे भविष्य उद्ध्वस्त करणाऱ्या या जुगार अड्ड्यांवर पोलीस प्रशासन कधी धडक कारवाई करणार? पत्रकारांना धमकावणाऱ्यांवर गुन्हे दाखल होणार का? असे अनेक प्रश्न आता सामान्य नागरिक विचारू लागले आहेत. शहरातील वाढत्या अवैध कारभारामुळे तेल्हारा शहराची प्रतिमा मलिन होत असून तातडीने कठोर कारवाईची मागणी जोर धरू लागली आहे.

# अकोला-शेगाव मार्गावरील टी-पॉईंटजवळ रस्त्याला मोठ्या भेगा

♦ दुर्घटना घडण्यापूर्वीच भेगा बुजवण्याची मागणी

प्रतिनिधी १५ मे



**अकोला :** शेगाव मार्गावरील टी-पॉईंटजवळ असलेल्या सिमेंट रस्त्यावर पुन्हा एकदा मोठ्या भेगा पडल्या आहेत. यापूर्वी याच भेगांमुळे झालेल्या भीषण अपघातात दोन जणांना आपला जीव गमवावा लागला होता. त्या घटनेनंतर संबंधित विभागाच्या कामकाजाबाबत नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त करण्यात आला होता.

अपघाताच्या घटनेनंतर काही स्वयंसेवी संस्था आणि नागरिकांनी पुढाकार घेऊन या भेगा बुजवल्या होत्या. मात्र, आता पुन्हा या भेगा उघड्या पडल्या आहेत. या मोठ्या भेगांमुळे कधीही मोठा अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पावसाळ्यात या भेगांमध्ये पाणी साचल्यास परिस्थिती अधिक गंभीर होऊ शकते. त्यामुळे, पुन्हा एखादी जीवितहानी होण्यापूर्वीच संबंधित विभागाने या भेगा तातडीने बुजवाव्यात, अशी मागणी जोर धरत आहे.

# जिल्हास्तरीय खरीप हंगाम पूर्व आढावा बैठक १८ मे रोजी

प्रतिनिधी १५ मे

**अकोला :** जिल्हास्तरीय खरीप हंगाम पूर्व आढावा बैठक राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ?ड. आकाश फुंडकर यांच्या अध्यक्षतेत १८ मे रोजी नियोजनभवनात दुपारी ३ वाजता होणार आहे. मान्यवर लोकप्रतिनिधींसह कृषी व इतर संबंधित यंत्रणा बैठकीला उपस्थित राहतील. बी=बियाणे, खते आदी कृषी निविष्ठांची उपलब्धता, खरीप कर्ज वितरण, खरीप क्षेत्र, पीक नियोजन, कृषी पथके, मान्सून स्थिती, आवश्यक यंत्रणा आदी विविध बाबींविषयी या बैठकीत चर्चा होईल.

# खुल्या प्रवर्गातील आर्थिक दुर्बलांसाठी 'अमृत'ची योजना, ड्रोन'चे विनामूल्य प्रशिक्षण

प्रतिनिधी १५ मे

**अकोला :** अमृत या राज्य शासनाच्या स्वायत्त संस्थेतर्फे खुल्या प्रवर्गातील आर्थिक दुर्बलांसाठी 'ड्रोन'चे विनामूल्य प्रशिक्षण देण्यात येणार आहे. प्रशिक्षितांना परवानाही मिळणार असून, इच्छूकांनी ऑनलाइन अर्ज भरावा, असे आवाहन जिल्हा समन्वयक धनंजय कुलकर्णी यांनी केले आहे. अमृत ड्रोन मिशन या नावाने मोहीम राबवली जात आहे. हा १० दिवसांचा निवासी कोर्स अमृत संस्थेकडून लक्ष्यित घटकांसाठी मोफत राबवला जातो. राज्यात आठ ठिकाणी संस्थेतर्फे प्रशिक्षण दिले जाते. ड्रोन ऑपरेटर (पायलट) प्रशिक्षण कार्यक्रमामुळे युवकांसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात करिअरच्या नव्या संधी खुल्या होत आहेत. ड्रोनच्या वापराची क्षेत्रे आज विस्तारली असून, शेती फवारणी, पीक सर्वेक्षण, भूमापन (सर्व्हे), व्हिडिओग्राफी व फोटोग्राफी, सरकारी प्रकल्प निरीक्षण अशा अनेक क्षेत्रांमध्ये ड्रोनचा प्रभावी वापर केला जातो. त्यामुळे या क्षेत्रातील प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करण्याची गरज निर्माण झाली आहे. हे नेमके ओळखून अमृत संस्थेने ड्रोन मिशनची सुरुवात केली. महाराष्ट्रातील खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील युवकांना, विशेषत: ग्रामीण क्षेत्रात स्वयंरोजगार व रोजगार निर्मिती करणारे प्रशिक्षण देणे, हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

# आठ दिवसांपूर्वी घेतलेली नवी कोरी 'एम्पियर' लंपास

प्रतिनिधी १५ मे

**अकोला :** एखादी नवी वस्तू घेताना मनात जेवढा आनंद असतो, तीच वस्तू डोळ्यादेखत नाहीशी झाली की तेवढेच दुःख होते. असाच काहीसा अनुभव शहरातील महेश गुप्ता यांना आला. जुन्या बस स्टँड परिसरातील महेश गुप्ता यांच्या ऑफिस समोरून चोरट्यांनी आठ दिवसांपूर्वी घेतलेली नवी कोरी 'एम्पियर' इलेक्ट्रिक गाडी लंपास केली. विशेष म्हणजे, हा सगळा प्रकार पोलीस स्टेशनच्या हाकेच्या अंतरावर घडला असून, 'डिजिटल सुरक्षा' किती तोकडी आहे हे पुन्हा एकदा चव्हाट्यावर आले आहे.महेश गुप्ता यांनी अत्यंत हौसेने गीता नगर भागातून ही 'एम्पियर' गाडी खरेदी केली होती. अजून गाडीला आरटीओ क्रमांक सुद्धा मिळाला नव्हता. केवळ आठ दिवस जुनी असलेल्या या गाडीवरची चमक अजून तशीच होती. रोजच्याप्रमाणे ते जुन्या बस स्टँड समोरील आपल्या ऑफिसमध्ये कामासाठी आले आणि गाडी बाहेर पार्क केली. मात्र, काही वेळाने बाहेर आल्यावर त्यांना धक्काच बसला; जिथे गाडी उभी होती, तिथे केवळ मोकळी जागा उरली होती. तपासासाठी जेव्हा परिसरातील सीसीटीव्ही कॅमेरे तपासण्यात आले, तेव्हा एक धक्कादायक वास्तव समोर आले. ऑफिसच्या बाजूचे सीसीटीव्ही बंद होते. एवढेच नाही तर टॉवर जवळचे महत्त्वाचे कॅमेरे सुद्धा तांत्रिक कारणास्तव बंद असल्याचे समजले. सुरक्षेसाठी लावलेले हे 'तिसरे डोळा' ऐन वेळी निकामी ठरल्याने चोरट्यांचे फावले असून, तपासात आता मोठा अडथळा निर्माण झाला आहे. विना नंबरची ही गाडी शोधण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर आहे. मात्र, या घटनेने शहरातील सीसीटीव्ही यंत्रणेचा फोलपणा पुन्हा एकदा उघडा पडला आहे.

# न्यायालय परिसरात दहशतवादी व्हिडीओ व्हायरल प्रकरणी आरोपीला जामीन नाकारला

प्रतिनिधी १५ मे

**अकोला :** न्यायालयाच्या परिसरात विनापरवानगी व्हिडीओ शूटिंग करून त्यास कुख्यात डॉन दाऊद इब्राहिम संदर्भातील संवाद जोडून सोशल मीडियावर प्रसारित केल्याप्रकरणी आरोपी शेख वसीम शेख बशीर याचा जामीन अर्ज जिल्हा व सत्र न्यायाधीश क्रमांक तीन आर. ए. शिंदे यांच्या न्यायालयाने फेटाळला आहे.

प्रकरणातील फिर्यादीनुसार, ६ मे रोजी आरोपी शेख वसीम शेख बशीर याने अकोला जिल्हा न्यायालय परिसरात विनापरवाना मोबाइलद्वारे व्हिडीओ चित्रित केला. न्यायालयीन परिसरात व्हिडीओ शूटिंगला प्रतिबंध असताना आरोपीने मोबाइलवर चित्रीकरण करून त्या व्हिडीओच्या बॅकग्राउंडला दहशतवादी दाऊद इब्राहिम संदर्भातील संवाद समाविष्ट केला. सदर व्हिडीओमध्ये अकोला जिल्हा व सत्र न्यायालयाची इमारत स्पष्टपणे दिसत आहे.

तपासादरम्यान आरोपीविरुद्ध यापूर्वीही खुनासह गंभीर स्वरूपाचे इतर गुन्हे दाखल असल्याची बाब समोर आल्याचे सूत्रांनी सांगितले. सदर प्रकरणात सरकार पक्षातर्फे रामदासपेठ पोलिसांच्या वतीने अतिरिक्त सरकारी विधिज्ञ, ॲड. आर. एस. रेलकर यांनी कामकाज पाहिले.

आरोपीतर्फे दाखल करण्यात आलेल्या जामीन अर्जावर सुनावणीदरम्यान न्यायालयाने प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेत आरोपीचे कृत्य सामाजिकदृष्ट्या घातक असल्याचे नमूद केले.

न्यायालयाने आपल्या आदेशात निरीक्षण नोंदवताना म्हटले की, न्यायालयीन परिसरात विनापरवानगी चित्रीकरण करून एका घोषित दहशतवाद्याचा संदर्भवापरत समाजात भीती व दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला असून, असे कृत्य पूर्णतः अयोग्य व गंभीर स्वरूपाचे आहे.

त्यामुळे आरोपीस जामीन मंजूर करण्यास न्यायालयाने नकार दिला.

# वाढते तापमान आणि वीजेच्या लपंडावाने झोपेचे खोबरे

अकोला. ग्रामीण भागात विजेचा लपंडाव, नागरिक त्रस्त
कुलरचा गारवा देखील कामात आला नसल्याचे चित्र
मध्य रात्रीनंतर अनेक अकोलेकरांची उडाली झोप

प्रतिनिधी १५ मे

**अकोला :** आज शहरातील अनेक नागरिकांनी रात्री पुरेशी झोप झाली नसल्याची तक्रार केली आहे. मध्यरात्री अचानक अनेकांची झोप उडाली आणि झोपेचे खोबरं झाले. वाढते तापमान आणि काही भागात विजेचा लपंडाव पाहता कुलर ने देखील गरमीपुढे हात टेकले होते. अकोला जिल्ह्याच्या ग्रामीण भागात सध्या विजेचा लपंडाव सुरू आहे. एकीकडे भीषण गर्मी, तापमान ४६ अंशापर्यंत आणि त्यात वीज पुरवठा कधीही खंडित होत आहे. त्यामुळे नागरिक त्रासले आहे. रात्री अपरात्री केव्हाही वीज पुरवठा नसतो. त्यामुळे नागरिक त्रास सहन करीत आहेत. दोन तीन दिवसांपासून दमट हवामान आहे. अशावेळी कूलर काम करत नाहीत आणि पंख्यावर भागत नाही अशी स्थिती निर्माण झाली आहे. अशा वेळी वीज पुरवठा कधी खंडित होईल सांगता येत नाही. दिवसा रात्री विजेचा लपंडाव सुरू असतो. महावितरण यंत्रणेने नागरिकांची या जाचातून मुक्तता करावी अशी मागणी केली जात आहे. कारण त्या शिवाय पर्याय नाही. वाढते तापमान आणि वीजेचा लपंडाव पाहता काही अकोलेकरांची झोप उडाली असून अनेकांनी पुरेशी झोप न झाल्याची ओरड केली आहे. अनेक भागात कुलर सुरु असताना त्या कुलरने देखील उष्णतेपुढे हात टेकल्याचे चित्र होते. नेमकी कशाने अकोलेकरांची झोप उडाली असा प्रश्न पडला आहे.

# आगर परिसरात ट्रॅक्टर ट्रॉली चोरीने ग्रामस्थ भयभीत

प्रतिनिधी १५ मे



**कुटासा :** आगर परिसरात चोरीच्या घटना वाढलेल्या दिसत आहे. पोलिसांचा धाक संपल्याची चर्चा आता उघडपणे होऊ लागली आहे. एकेकाळी या भागात गुरांची चोरी होत होती, मात्र आता चोरट्यांची मजल थेट शेतात व घरासमोर उभ्या असलेल्या ट्रॅक्टरपर्यंत पोहोचली आहे. त्यामुळे शेतकरी आणि नागरिकांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

आगर येथील शेतकरी चेतन नामदेवराव फुकट यांच्या मालकीचा स्वराज कंपनीचा ७४४ एफ. ई.पी.एस. ४८ एच. पी. ट्रॅक्टर (क्र. एमएच ३० बीएल १५९३) तसेच टॉली (क्र. एमएच ३० जे १८९७) अज्ञात चोरट्यांनी रात्रीच्या अंधारात लंपास केला सुमारे चार लाख रुपयांचा मुद्देमाल चोरीला गेल्याने परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे.विशेष म्हणजे, संबंधित ट्रॅक्टर सुरेश कराळे यांच्या शेतात कडुलिंबाच्या झाडाखाली उभा करण्यात आला होता. रात्री ११ वाजेपर्यंत ट्रॅक्टर जागेवर होता, मात्र सकाळी तो गायब झाल्याचे दिसून आले. एवढा मोठा ट्रॅक्टर ट्रॉलीचा मुद्देमाल चोरटे सहजपणे घेऊन जातात आणि पोलिस यंत्रणेला त्याचा मागमूसही लागत नाही,यामुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली असुन हि घटना घडून दोन दिवस उलटूनही पोलिसांकडून ठोस कारवाई किंवा अपेक्षित उत्तर मिळत नसल्याने चोर मोकाट व पोलिस यंत्रना निष्क्रिय होत चालल्याचा आरोप ग्रामस्थांन कडुन केल्या जात आहे. आगर परिसरात वाढत्या चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून रात्री गावात पोलीसांची गस्त वाढवावी, आरोपींना तातडीने अटक करावी व चोरीच्या घटना घळु नये या करीता ठोस उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# वाट चुकलेल्या चिमुकलीला ग्रामीण पोलिसांचा आधार; काही तासांत दिले आईच्या ताब्यात

## दामिनी पथकाच्या सतर्कतेमुळे ६ वर्षीय मुलगी सुखरूप परत

वि प्रतिनिधी १५ मे



**अकोट :** शहरात वाट चुकलेल्या सहा वर्षीय चिमुकलीला अकोट ग्रामीण पोलिसांनी तत्परतेने मदत करून तिच्या आईच्या ताब्यात सुखरूप दिल्याची घटना बुधवारी घडली. पोलिसांच्या संवेदनशील भूमिकेमुळे नागरिकांकडून कौतुक व्यक्त होत आहे.अकोला येथील श्रावणी मनोज मोकळकर ही सहा वर्षीय मुलगी अकोटमधील शौकत अली चौक परिसरात आपल्या मावशीकडे आली होती. दुपारी चार वाजताच्या सुमारास ती घराबाहेर पडली; मात्र परिसराची माहिती नसल्याने वाट चुकत जवाहर रस्त्याने छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत पोहोचली. घाबरलेल्या अवस्थेत ती रडत असल्याचे पाहून स्थानिक नागरिकांनी तिची विचारपूस केली;मात्र तिला व्यवस्थित माहिती सांगता येत नव्हती.दरम्यान अकोट ग्रामीण पोलीस ठाण्याचे दामिनी पथक तांदुळवाडी परिसरातून पेट्रोलिंग करून परत येत असताना चौकात गर्दी दिसली. पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत चिमुकलीला ताब्यात घेतले.घाबरलेल्या अवस्थेत असलेल्या मुलीला ग्रामीण पोलीस ठाण्यात आणून तिला बिस्कीट, पाणी व नाश्ता देत धीर देण्यात आला.पोलिसांनी प्रेमाने विचारपूस केल्यानंतर ती अकोल्याहून मावशीकडे आल्याचे तसेच तिची आई पणज येथे असल्याचे सांगत होती. यानंतर पोलीस हवालदार भास्कर सांगळे यांनी पणज येथील पत्रकार दिनेश बोचे यांच्याशी संपर्क साधून मुलीबाबत माहिती घेतली. चौकशीत ही मुलगी पणज येथील किशोर धोंगडे यांच्या नात्यातील असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर पोलिसांनी मुलीच्या मामाला व आईला संपर्क करून चिमुकलीला त्यांच्या ताब्यात सुखरूप सुपूर्द केले. ही कार्यवाही अकोट ग्रामीण पोलीस निरीक्षक किशोर जूनघरे मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक वैभव तायडे, अर्चना इंगळे, दामिनी वानखडे, पोलीस हवालदार भास्कर सांगळे, शुभम लुंघे व शैलेश जाधव यांनी केली.


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क** – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135


CMYK CMYK